अलिबाग येथे ऑफीसमध्ये
रिसेप्शनसाठी
मुलगा/मुलगी पाहिजे.
संपर्क
९१७५७०८९०६/
८९७५८१६९००

रायगड, बुधवार, दि. २५ मार्च २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## ‘कोरोना परिस्थितीप्रमाणे तयार रहा’

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षावर पंतप्रधान मोदी यांनी लोकसभेत एक महत्त्वाचे निवेदन केले. इराण आणि इस्रायल यांच्यातील वाढता तणाव आणि त्याचे जागतिक परिणाम लक्षात घेता, मोदींचे हे भाषण महत्त्वपूर्ण होते. जागतिक परिस्थिती वेगाने बदलत आहे, त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणावर संभाव्य परिणाम होऊ शकतो. आपल्या भाषणात मोदींनी संभाव्य जागतिक इंधन संकट, जागतिक पुरवठा साखळी आणि स्थिरतेसंदर्भात चर्चा केली. तसेच, कोरोनाच्या परिस्थितीसारखे आपण तयार राहायला हवे, असेही ते म्हणाले.

## वेधक

### रोहित पवारांच्या लढ्याला यश

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या लढ्याला अखेर यश आले आहे. बारामतीमधील अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी अखेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दुर्घटनेप्रकरणी कर्नाटकच्य बंगळुरू येथील शेशाद्रीपुरम पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दुर्घटनेमागे मोठा गुन्हेगारी कट असल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे मंगळवारी (दि.२४) रोहित पवार यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला होता. नागपुरात बस स्टॉपवरुन चार्जर चोरीला गेला म्हणून गुन्हा दाखल झाला, चप्पल चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल झाला, मात्र अजित दादांच्या संदर्भात गुन्हा दाखल झाला नाही, असेही रोहित पवार यांनी म्हटले होते.

### उद्धव ठाकरे यांचे निरोपाचे भाषण

**मुंबई :** राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विधान परिषदेतील कार्यकाळ संपत आला असून मंगळवारी (दि.२४) त्यांनी निरोपाचे भाषण केले. यावेळी त्यांनी २०१९ साली मुख्यमंत्री पदाची अचानक पडलेली जबाबदारी आणि अचानपणे या जबाबदारीतून पायउतार झाल्याचे अनुभव व्यक्त केले. तसेच, राज्यातील कवींच्या कविता सभागृहात वाचून दाखवत राज्यातील राजकीय परिस्थितीवर त्यांच्या खुमासदार शैलीत भाष्य केले. पुढे म्हणाले की, विधान परिषदेत का यावं? सहा वर्षे यावं की नाही यावं, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मात्र, निरोपाच्या वेळी यावं. कारण आपल्याविषयी ऐकायला मिळतं. तुमच्या मनात काय होतं, हे यादिवशी कळतं.

### हरिश राणाची मरणयातनांतून सुटका

**नवी दिल्ली :** गेल्या १३ वर्षांपासून कोमात असलेल्या हरिश राणा याची मरणयातनांमधून सुटका झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाला परवानगी दिल्यानंतर एम्समध्ये हरिश राणाची लाइफ सपोर्ट सिस्टिम हटवण्यात आली होती. त्यानंतर त्याचे पाणीही बंद केले होते. हरिश राणाने मंगळवारी (दि.२४) अखेरचा श्वास घेतला. १४ मार्चपासून एम्सच्या आयआरसीएचच्या पॅलेटिव्ह केअर वॉर्डमध्ये हरिशला दाखल केले होते. भारतात पहिल्यांदाच निष्क्रिय इच्छामरण देण्यात आले. हरिश राणाच्या आई वडिलांनी त्याला इच्छामरण मिळावे यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

### खरातचा एसआयटी पथकाकडे ताबा

**मुंबई :** भोंदूबाबा अशोक खरातला आड एसआयटी पथकाने मंगळवारी (दि.२४) नाशिकच्या न्यायालयात हजर केले होते. यादरम्यान, खरात महिलांना खडे, पेढे आणि पाण्यात काही पदार्थ मिसळून देत असे, त्यामुळे त्यांना अस्वस्थ वाटत असे आणि त्यानंतर त्यांचे शोषण केले जात असल्याचा आरोप करण्यात आला. त्यानुसार न्यायालयाने अशोक खरातप्रकरणी सुनावणी करताना त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून २९ मार्चपर्यंत एसआयटी पथकाकडे ताबा देण्यात आला आहे. यावेळी भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख तृप्ती देसाई यांनी, ‘भोंदू अशोक खरातला आमच्या ताब्यात द्या, त्याचं तोंड फोडायचंय’, असे म्हणत भूमिका घेतली.

# ‘अभय’ला नकार
# 134 कोटींचा भार

- पाण्याची निव्वळ थकबाकी २१ कोटी वसूल करण्याचा प्रयत्न फेल
- ग्रामपंचायतींना भरावे लागणार १३४ कोटी रुपये

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**अभय योजना जाहीर करताना थकबाकीदारांना दिलासा मिळेल, वसुलीला वेग येईल, असा दावा करण्यात आला होता. मात्र, अलिबाग आणि रोहा तालुक्यातील ३२ ग्रामपंचायतींनी या योजनेला प्रतिसाद न दिल्याने २१ कोटी रुपयांची निव्वळ थकबाकी झाली आहे. परिणामी, ही योजना कागदावरच राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या निर्णयाचा फटका आता अधिक गंभीर स्वरूपात बसणार आहे. वेळेत थकबाकी न भरल्यास ही रक्कम थेट १३४ कोटींवर जाणार असून, ग्रामपंचायतींचे आर्थिक गणित कोलमडणार आहे. आधीच निधीअभावी अनेक विकासकामे रखडलेली असताना, हा वाढीव बोजा ग्रामपातळीवरील कारभार पूर्णपणे विस्कळीत करणार असल्याचे दिसून येत आहे.**




### एमआयडीसीच्या पाण्याची प्रतीक्षा कायम

कारखान्यांना पाणी पुरवठा करणाऱ्या एमआयडीसीद्वारे अनेक गावांना देखील पाणी पुरवठा केला जातो. परंतु, पाणी वेळेवर व मुबलक मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. काही गावांमध्ये आठ दिवसाआड तर काही गावांमध्ये पंधरा दिवस पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. अनेक वेळा पाण्यासाठी रात्रीही जागण्याची वेळ येत असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, एमआयडीसीकडून कारखान्यांसह गावांनाही पाणीपुरवठा केला जातो. सुमारे १ लाखाहून अधिक नागरिक या योजनेवर अवलंबून आहेत. प्रति लिटर साडेचार रुपये दराने पाणी दिले जात असतानाही थकबाकी वाढत जाणे, आणि त्यावर उपाय म्हणून आणलेली योजना निष्फळ ठरणे यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पाणी पुरवठा करूनही अनेक ग्रामपंचायतींकडून पाण्याच्या थकबाकीचा प्रश्न कायमच आहे. त्यामुळे दरवर्षी निव्वळ थकबाकीवर दंडात्मक रक्कमेसह थकबाकीचा भार पडत आहे. महानगरपालिकांसह नगरपरिषद, पान ५ वर

# विमानतळ नामकरणाचा प्रश्न पेटणार

- जासईतून ‘आरपार’ लढ्याची हाक
- रश्मिता पोपेटा मैदानात; सरकारला थेट इशारा

**। पनवेल । ग्रामीण प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवत सरकारने दाखवलेल्या उदासीनतेविरोधात आता जनतेचा संताप उफाळून येऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर जासई येथील रश्मिता पोपेटा हिने आक्रमक भूमिका घेत थेट आंदोलनाचा बिगुल वाजवला आहे.

जासई ग्रामपंचायतीत झालेल्या बैठकीत या लढ्याची ठोस रणनीती जाहीर करण्यात आली. दि.बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील यांची उपस्थिती आणि स्थानिक पातळीवरील वाढता पाठिंबा यामुळे या आंदोलनाला नवे बळ मिळाले आहे. सरपंच संतोष घरत यांनीही या बैठकीत महत्त्वाची भूमिका बजावत पाठिंबा दर्शविला. यावेळी ‘आता मागे हटणार नाही, ही आरपारची लढाई असेल’, असा इशारा देत रश्मिता पोपेटा हिने सरकारला थेट आव्हान दिले आहे. तसेच, विमानतळ नामकरणाची अधिकृत अधिसूचना जाहीर होईपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा तिचा ठाम पवित्रा आहे.

येत्या आठवड्यापासून गावोगावी ‘जननिर्धार यात्रा’ काढत जनतेचा कौल गोळा केला जाणार आहे. पंच कमिटींकडून लेखी पाठिंबा घेत आंदोलन अधिक व्यापक करण्याची तयारी सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, तरुणाईला या लढ्यात मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. जून महिन्यात चिंचपाडा पुलाशेजारी उपोषणाला सुरुवात होणार असून, गरज पडल्यास मुंबईकडे जाणारे महामार्ग रोखण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासन आणि सरकारवर मोठा दबाव निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, या आंदोलनामुळे आतापर्यंत शांत बसलेल्या लोकप्रतिनिधींवर टीकेची झोड उठू लागली असून, राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# बार कौन्सिल निवडणूक प्रक्रिया पार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा निवडणूक २०२६ निमित्त मंगळवारी (दि.२४) राज्यभर मतदान प्रक्रिया पार पडली. महाराष्ट्र, गोवा तसेच दिव आणि दमण विभागातून एकूण १५५ उमेदवार रिंगणात असून त्यापैकी २३ उमेदवारांची निवड होणार आहे. त्यामध्ये ५ जागा महिला उमेदवारांसाठी राखीव आहेत. यावेळी सुमारे १ लाख ९० हजार अधिकृत वकील मतदारांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी उत्साहाने सहभाग घेतला. मुंबई उच्च न्यायालयाच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये मतदान केंद्रे उभारण्यात आली होती.




# रेवदंडा शाळेत अघोरी कृत्याने खळबळ

### अंधश्रद्धा की भ्रष्टाचार झाकण्याचा डाव?



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील जिल्हा परिषद शाळेत घडलेल्या अघोरी कृत्यामुळे परिसरात भीती, संताप आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. वर्गात लिंबू, हळद, गुलाल, रक्ताचे डाग आढळल्याने अंधश्रद्धेचा प्रकार की यामागे मोठे राजकीय षडयंत्र दडले आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथील मारुती आळीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अज्ञात व्यक्तींनी घुसखोरी करून अघोरी प्रकार केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. शाळेच्या पाठीमागील दरवाजा तोडून वर्गात भाकरीचे पीठ, लिंबू, लाल दोरे, तुटलेल्या बांगड्या तसेच करणीसदृश्य साहित्य पसरवण्यात आले होते. याशिवाय दरवाजा आणि स्वच्छतागृह परिसरात रक्तासारखे डाग आढळल्याने भीतीचे वातावरण निर्माण पान ५ वर

# स्थानिकांना डावलून पुलाचे बांधकाम

### मुरूडमधील मच्छिमार सोसायटी एकत्र येऊन आंदोलनाच्या पावित्र्यात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

स्थानिक मच्छिमारांना विश्वासात न घेता टोकेखार ते तुरूंबाडी पुलाचे काम सुरु करण्यात आले. त्यामुळे रोजगारावर मोठे संकट येण्याची भिती मच्छिमारांनी व्यक्त केली आहे. शासनाच्या या मनमानी कारभाराविरोधात श्री महालक्ष्मी मच्छिमार सोसायटीसह अन्य सोसायटी आक्रमक झाली आहे. प्रत्येक कुटूंबातील सदस्यांना भविष्यामध्ये उदरनिर्वाहसाठी आर्थिक मदत मिळावी. पुलाचे बांधकाम चालु असेपर्यंत बेरोजगारांना रोजगार मिळावा, अशा अनेक मागण्यांसाठी हिंदूस्थान कंस्ट्रक्शन कंपनीच्या प्रकल्प व्यवस्थापक, जिल्हा प्रशासन व तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. येथील असंख्य मच्छिमार सोसायटी एकत्र येऊन पुलाच्या बांधकामविरोधात आंदोलन करणार, असा इशारा देण्यात आला आहे.

राजपूरी खाडीमध्ये अनेक पिढ्यांपासून उपजिविकेचे साधन म्हणून मासेमारी करून मच्छिमार त्यांचा उदरनिर्वाह चालवित आहेत. मासेमारी हा व्यवसायावर येथील हजारो नागरिक अवलंबून आहेत. मात्र २००४ मध्ये दिघी बंदर व आगरदांडा टर्मिनलमध्ये दिघी पोर्टची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे मासेमारीचे क्षेत्र कमी झाले आहे. त्याचा विपरीत परिणाम मच्छिमारांवर मोठ्या प्रमाणात झाला आहे. त्यामध्ये आता टोकेखार ते तुरूंबाडी दरम्यान प्रवासी मार्गाच्या पुलाचे काम सुरु करण्यात आले आहे. राज्याचे मुख्यमंत्री हस्ते ऑनलाईन पध्दतीने १३ ऑक्टोबरमध्ये प्रवासी पुलाचे भूमीपूजन करण्यात आले. मुरूड तालुक्यातील टोकेखार आणि म्हसळा तालुक्यातील तुरूंबाडी दरम्यानचा हा पुल राजपूरी खाडीमध्ये असणार आहे. या पुलाच्या बांधकामाबाबत स्थानिक मच्छिमारांना विश्वासात घेण्यात आले पान ५ वर

# पेणमधील सेलिब्रेशन रिसॉर्टमध्ये कुंटणखाना




**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील बोरगाव येथे असणाऱ्या सेलिब्रेशन रिसॉर्टवर पेण पोलिसांनी धडक कारवाई करत सात जणांना ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बोरगाव येथील सेलिब्रेशन रिसॉर्टवर अनैतिक धंदा सुरू असल्याची माहिती पेण पोलिसांना मिळाली होती. परंतु, ठोस माहिती न मिळाल्याने कारवाईस विलंब होत होता. अखेर सोमवारी (दि.२३) पोलीस अधिक्षक आंचल दलाल आणि उपविभागीय पोलीस अधिक्षक जालींदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली व पेणचे पोलीस निरिक्षक संदीप बागूल यांच्या नेतृत्वाखाली दोन पथके तयार करण्यात आली.रात्री ९.०० वाजण्याच्या सुमारास या दोन्ही पथकांनी पान ५ वर

# कॉलेजमधील विद्यार्थिनीवर अत्याचार

- विवाहित लॅब असिस्टंटकडून फसवणूक
- धर्मांतरासाठीही टाकला दबाव






**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ जवळील ममदापूर येथे असलेले दिलकॅप इंजीनियरिंग कॉलेज हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणासाठी चर्चेत आहे. या कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या १९ वर्षीय विद्यार्थिनीला लव्ह ट्रॅपमध्ये ओढून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. पीडितेकडून कॉलेजमधीलच विवाहित लॅब असिस्टंटने लग्नाचे खोटे आमिष दाखवून फसवणूक केली आणि नंतर धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी या महाविद्यालयात इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होती. तिथेच लॅब असिस्टंट म्हणून कार्यरत असलेला तौफिक निसार ठाणगे याने तिच्याशी ओळख पान ५ वर

# टेलिग्राम टास्कमधून ऑनलाईन फसवणूक

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

टेलिग्राम टास्कच्या माध्यमातून ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. या प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात म्हसळा पोलिसांना यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.५ ते ७ ऑक्टोबर दरम्यान टेलिग्राम टास्कच्या नावाखाली म्हसळ्यातील राहुल वसंत यांची यूपीआय व आरटीजीएस द्वारे वेगवेगळ्या खात्यांमध्ये पैसे जमा करून फसवणूक करण्यात आली होती. या गुन्ह्यात आरोपींनी एकूण १२ लाख ५३ हजार १५३ रुपयांची रक्कम लंपास केल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड व सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी केला. या गुन्हात एकूण ६ जणांचा समावेश असून त्यापैकी रोहीत संजय गमरे (४०), रोशन आनंद सिंग (२५), अंकीत विरेंद्र विश्वकर्मा (२३) व वृषभ बबन जाधव (२६) या चौघांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित अनुज सिंग आणि जोरा राम या दोघांचा शोध सुरू आहे.

### ‘या’ शाळांमध्ये प्रवेश घेऊ नका | शिक्षण अधिकाऱ्यांचे आवाहन

# ३५ प्राथमिक शाळा अनधिकृत

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील ३५ शाळा अनधिकृत असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्यावतीने जिल्ह्यातील अनधिकृत प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश घेऊ नये, असे आवाहन जिल्हा परिषद प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांनी केले आहे.

### कारवाई करणार: ललीता दहीतुले

श्रीवर्धन तालुक्यातील ३, म्हसळा तालुक्यातील ३, खालापूर तालुक्यातील २, कर्जत तालुक्यातील १, उरण तालुक्यातील १, अलिबाग तालुक्यातील २, महाड तालुक्यातील १ तर पनवेल तालुक्यातील २२ शाळांचा समावेश आहे. या शाळांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांनी सांगितले आहे.

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील आराठी येथील किड्स पॅरडाईस प्रि स्कूल, इंपेरिअल स्कूल अयार मोहल्ला, रानवली येथील अंजुमन इस्लाम जंजिरा, म्हसळ्यातील अल इहसान इंग्लिश स्कूल, इतकान इंग्लिश स्कूल गोंडघर, ए.आर. उंड्रे इंग्लिश स्कूल मेंदडी, खालापूरमधील सेंट मेरी स्कूल कोपरी, भारती ॲकेडमी ॲण्ड ज्युनियर कॉलेज खोपोली, कर्जतमधील बांधिवली येथील सेंट औरा ई-टेक्नो स्कूल, उरणमधील नागराज स्कूल बोरी, अलिबागमधील बोडणी येथील ज्ञानार्जन प्रि प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल, सक्सेस एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी एमएसटी इंटरनॅशनल स्कूल, महाडमधील लिटील एंजल स्कूल पानसरी मोहल्ला, पनवेलमधील विचूंबे येथील आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल, नेरेमधील न्यू इंग्लिश स्कूल, करंजाडे येथील एसजीटी इंटरनॅशनल स्कूल सेक्टर ४, पान ५ वर

# लाडक्या बहिणींची पुन्हा धावाधाव

### २२ हजार ३७५ महिलांवर केवायसी करण्याची वेळ

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळवण्यासाठी महिलांना पुन्हा एकदा कागदपत्रांच्या फेऱ्यात अडकावे लागणार आहे. मागील महिन्यात करण्यात आलेल्या केवायसी प्रक्रियेत तांत्रिक अडचणी आणि त्रुटी आढळल्याने जिल्ह्यातील तब्बल २२ हजार ३७५ महिलांवर पुन्हा केवायसी करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे सेवा केंद्रांवर महिलांची पुन्हा धावपळ सुरू होणार असून, आधीच वेळ आणि खर्च सहन केलेल्या लाभार्थींना पुन्हा त्रास सहन करावा लागणार आहे. योजना ‘लाडकी’ असली तरी अंमलबजावणीतल्या त्रुटींमुळे महिलांसाठी तीच डोकेदुखी ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

महिलांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे सक्षमीकरण करणे, स्वावलंबन वाढविणे, कुटूंबाच्या आर्थिक स्थैर्यास हातभार लावणे हा उद्देश ठेवून महिला व बालविकास विभागाने खास महिलांसाठी लाडकी बहिण योजना सुरु केली. या योजनेची सुरुवात २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी झाली. महिलांना या योजनेअंतर्गत दर महिन्याला दीड हजार रुपये अनुदान देण्यास सुरुवात करण्यात आली. त्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रीया राबविण्यात आली. या योजनेला रायगड जिल्ह्यातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. मात्र या योजनेचा लाभ घेताना काहींनी अटी शर्तीचे पालन न केल्याने पुन्हा मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेअंतर्गत ई-केवायसी करण्याचा निर्णय मागील सहा महिन्यापुर्वी घेण्यात आला. त्यानुसार जिल्ह्यातील ६३ हजार ७८२ लाडक्या पान ५ वर



# भवानी माता मंदिराची प्राणप्रतिष्ठा

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील पिंपलोळी येथे ग्रामस्थ मंडळ यांनी लोकवर्गणीमधून भवानी मातेचे मंदिर उभारले आहे. या मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा ग्रामस्थांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. पिंपळोली गावातील ग्रामस्थांनी लोकवर्गणीमधून श्री भवानी मातेचे मंदिर उभारण्याचा संकल्प एक वर्षापूर्वी केला होता. हा संकल्प पूर्ण झाला असून तयार झालेल्या मंदिरात भवानी मातेच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम आणि धार्मिक विधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने देवीची पालखी ब्रास बँड पथकाच्या साथीने काढण्यात आली. तर पहिल्या रात्री परिसरातील भजनी बुवांचे चक्री भजन सादर झाले. त्यात तुळशीराम सोनावले, दिलीप भोईर, नरेश पाटील, संतोष काळन, पवन भोईर, किशोर क्षीरसागर या बुवांनी सेवा दिली. तर दुसऱ्या दिवशी मंदिराचा कलशारोहण सोहळा श्रीराम महाराज देशमुख यांचे हस्ते झाला. त्यावेळी श्री माऊली हरिपाठ मंडळ यांनी हरिपाठ सादर केला. तर रात्री अलिबाग येथील अश्विनी भोईर यांचे हरी कीर्तन सादर झाले.

**मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड**
**ई- निविदा सुचना सन २०२५-२६**
**म्यु.जा.क्र. ११००/ई-निविदा/मु.न.प. २०२५-२०२६**

मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी सोलर स्ट्रीट पथदिवे बसविणे. या कामांची ई- निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी-शर्ती http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २५/०३/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक ०१/०४/२०२६ आहे.

दिनांक :- २४/०३/२०२६ (शिक्का)
सही/-
मुख्याधिकारी
मुरुड जंजिरा नगरपरिषद

**अलिबाग नगरपरिषद**
**फेर ई-निविदा सुचना सन २०२६-२७**

अलिबाग नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील साहित्य पुरवठा करणे कामी ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सुचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०३/२०२६ पासून उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
अलिबाग नगरपरिषद

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे बिड बु. ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी तिचे विद्यमान मालक श्री. गणेश रघुनाथ रूठे यांचे कडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ३६ | ५ | ०.२५.८० | २.८४ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही करार, विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २५/०३/२०२६

**ॲड. प्रदिप मोतीराम सुर्वे**
ए २०२ स्वप्ननगरी को. ऑप. हौ. सोसायटी मुद्रे खुर्द कर्जत रायगड
फोन. नं. २२०१२६/९८५०१३५६५९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतींचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार रु पैसे |
|---|---|---|---|
| १) दिलीप धोंडूराम वाघपंजे रा. पनवेल ता. पनवेल | ३१० | ००.२०.२० | १.८४ |
| जि. रायगड | ३१२ | ००.०६.१० | ०.२२ |
| २) स्मिता दिलीप वाघपंजे रा. पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६ | ३११ | ००.२१.०० | ०.७६ |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींच्या मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतींमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २४/०३/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव ठाकुरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकती आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगांव ठाकुरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) गोपाळ सटु भगत<br>२) दत्ता सटु भगत<br>३) अनिता शांताराम लदगे<br>४) सुमित्रा भगवान भगत<br>५) अजय भगवान भगत<br>६) कोमल नरेश शेळके<br>७) जयश्री ज्ञानेश्वर बदे<br>८) संचिता सचिन म्हात्रे | १९ | ५ | ०-३०-००<br>पो.ख. ०-११-००<br>एकूण ०-४१-०० | ०.१९ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २५/०३/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने - नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०३/८१/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २४/०३/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

**प्रति,**
श्री/श्रीमती. ................................
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/ महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक ०१/०४/२०२६ रोजी, सकाळी ११:०० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०३, दिनांक ०१/०४/२०२६ ची**
**विषयपत्रिका**
**विषय**

**१. मागील सर्वसाधारण सभा दिनांक ०६/०३/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.**
**२. निवडणुक**
१. श्री. प्रविण काळुराम पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर तौलनिक संख्याबळानुसार एका सदस्याची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती करणेबाबत.
**३. प्रश्नोत्तरे**
**४. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**
१. श्री. शरद वसंतराव पाटील, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, यांचे नियुक्तीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.
२. पनवेल महानगरपालिकेच्या ०२ डायलॅसीस युनिटमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वापरण्यात येणाऱ्या मेडिकल गॅस सिलेंडरचे कंत्राटी तत्वावर Medical Gas Refilling करुन घेणेकरिता एजन्सीची नेमणुक करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविणे व त्याकरिता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना व बालकांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत रक्त पुरवठा व रक्त संक्रमण करणेस व खाजगी/स्वयंसेवी/शासकीय व अशासकीय/धर्मादाय संस्थेच्या रक्तपेढ्यामधुन रक्त पुरवठा करणेकामी Expression of Interest (EOI) मागविणेस मान्यता मिळणेबाबत.
४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड' मधील विविध ठिकाणी असलेल्या पनवेल महानगरपालिका मालकीच्या सर्व सार्वजनिक शौचालयांची आवश्यकतेनुसार दोन वर्षासाठी दुरूस्ती व नुतनीकरण करणे या कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
५. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे.
६. पनवेल महानगरपालिका मालकीचे अं.भु.क्र. १२२ प्रायमरी स्कूल व प्ले ग्राऊंड आरक्षित भूखंड जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल या संस्थेस ३० वर्षे कालावधीकरीता लिज भाडेतत्वावर उपलब्ध करून देणेबाबत.
(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

सही/-
महापालिका भवन, पनवेल — **नानासाहेब कामठे**
दिनांक : २४/०३/२०२६ — महापालिका सचिव
सोबत : विषयांचे गोषवारे — पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक सुर्यकांत किसन भासे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|
| ४३/२ | एकूण क्षेत्र ००-६४-४० हे.आर.पॉ. असुन या क्षेत्रापैकी, सुर्यकांत किसन भासे यांचे मालकीची ००-१६-०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | ०.५९ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- २५ मार्च २०२६

**ॲड.शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, पतसंस्थेचा, खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे भिलवले, ता. खालापूर, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| नम्रता घनश्यामदास रूंगठा | ३८ | ३ | ०-०८-०० | ० | १२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए-४, ए विंग, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २५/०३/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


**महावितरण — शॉर्ट ई–निविदा सूचना**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-१२५, टी-१२६, टी-१२७ आणि टी-१२८/(२०२५-२६) अशी **चार** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. २५.०३.२०२६ पासून ते दि. २९.०३.२०२६ सकाळी ११.०० पर्यंत** उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. ३०.०३.२०२६ ला दुपारी १३.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चवणे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७०/८/अ/२ | एकूण क्षेत्र ०-६१-०० हे.आर | ०.२५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पाच दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- २५/०३/२०२६

सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**
ज.म.र.अर्ज ३७४/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. आदेश कमलाकर शेडगे,
रा. चोरढे, ता. मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड

विरुध्द

ग्रामसेवक
ग्रुप ग्राम पंचायत चोरढे, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त यांचे आजोबा कै. रामा जानु शेडगे, यांचा मृत्यु दि. २०/०५/१९८७ रोजी राहत्या घरी मौजे चोरडे, ता. मुरूड जंजिरा जि. रायगड येथे झाला आहे, त्यांच्या मृत्युची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चोरडे यांचे जन्म मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे, त्यामुळे मृत्यु नोंदीचे मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६६ चे कलम १३ (३) अन्वये दाखल केलेला आहे. तरी, कै. रामा जानु शेडगे, यांचा मृत्यु दि. २०/०५/१९८७ रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे, न्यायालयांत दि. २१/१/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये मृत्युची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड जंजिरा

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. राजेश कमलाकर नाखवा यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे तिवरे, ता कर्जत, जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १२/२/ ब एकुण ०.४०.५० गुंठे, सर्व्हे नं १२/२/अ एकुण ०.६०.७० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २४/०३/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

अर्जदारतर्फे ॲड.उनेजा वसीम सय्यद

**जाहिर नोटीस**
**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात**
दिवाणी चौकशी अर्ज क्र.२४/२०२६

१) श्रीमती दिनांका दिलीप साळवी, वगैरे — अर्जदार
**विरूद्ध**
कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार नं.२ व ३ हे भाऊ व १ त्यांची आई असून त्यांचे वडील सदरकामी कै.श्री दिलीप कृष्णाजी साळवी हे दि.८/६/२०२३ रोजी मयत झालेले आहेत त्यांचे मृत्यूसमयी व त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार नं.१, २ व ३ म्हणून कायदेशीर वारसदार आहेत. त्याशिवाय मयतांस अन्य कोणीही वारस नाहीत. सदरकामी वारस दाखला मिळण्याकरीता सदर चे अर्ज दाखल केलेले आहे.

सदर अर्जाच्याकामी कोणाची काही एक हरकत असल्यास नेमल्या तारखेस स्वतः अगर अधिकृत प्रतिनिधी मार्फत नेमल्या तारखेस कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात हजर राहावे. त्यानंतर कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या मागणीप्रमाणे आदेश करण्यास येईल हे तुम्हास कळावे.

आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपिक सि.ज.सि.डी अलिबाग-रायगड** — (कोर्टाचा शिक्का) — सही/- **कनिष्ठ लिपिक सि.ज.सि.डी**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक दिपक मारुती म्हात्रे व मेघनाथ चंदर गायकवाड यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३०/५ | ००-१०-०० | ०.०६ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- २५ मार्च २०२६

**ॲड.शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बागायत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी ता. अलिबाग | ३७ | बागायत ०-७७-४० | १५.८७ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकती पैकी विक्रेता यांचे नावे असलेले ०-०५-२० हे. आर क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. लक्ष्मण महादेव कुंटे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक - २४/०३/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस - लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक हरिश्चंद्र मोरेश्वर घरत यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग | १५६७ | ०-४०-७० जिरायत<br>०-१६-७० बागायत<br>०-०६-८० पो.ख.<br>०-६४-२० एकुण | १०.३७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये हरिश्चंद्र मोरेश्वर घरत यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-३२-१० हे. आर., आकार ५ रू १९ पैसे जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक- २४/०३/२०२६

**ॲड. विराज शरद अंबुकर**
रा. थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९०२८८५१२८०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-चिंचोटी ता.अलिबाग, जि.रायगड, येथील सर्व्हे नंबर ९१/१, क्षेत्र ०-३३-२० हे.आर., पो.ख.०-०६-१० हे. आर. एकूण क्षेत्र ०-३९-३० हे.आर., आकार ८.५६ रू. पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१९-३० हे. आर. ही मिळकत ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक पुष्पा विलास माळी, अनुसया गोविंद मोहिते व संगीता लक्ष्मण सुतार सर्व रा. मु. चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २४/०३/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

अर्जदारतर्फे ॲड.उनेजा वसीम सय्यद

**जाहिर नोटीस**
**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात**
दिवाणी चौकशी अर्ज क्र. /२०२६

हर्षद अजित शिरगावकर — अर्जदार
**विरूद्ध**
कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार नं.१,२ हे भाऊ व ३ त्यांची आई असून त्यांचे वडील सदरकामी कै.अजित मनोहर शिरगावकर हे दि.२८/११/२०२० रोजी मयत झालेले आहेत त्यांचे मृत्यूसमयी व त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार नं.१, २ व ३ म्हणून कायदेशीर वारसदार आहेत. त्याशिवाय मयतांस अन्य कोणीही वारस नाहीत. सदरकामी वारस दाखला मिळण्याकरीता सदरचे अर्ज दाखल केलेले आहे.

सदर अर्जाच्याकामी कोणाची काही एक हरकत असल्यास नेमल्या तारखेस स्वतः अगर अधिकृत प्रतिनिधी मार्फत नेमल्या तारखेस कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात हजर राहावे. त्यानंतर कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या मागणीप्रमाणे आदेश करण्यास येईल हे तुम्हास कळावे.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपिक सि.ज.सि.डी अलिबाग-रायगड** — (कोर्टाचा शिक्का) — सही/- **कनिष्ठ लिपिक सि.ज.सि.डी**

## निवडक



### प्रभू श्रीरामांचा अद्वितीय उपदेश कार्यक्रम

**पनवेल** : राम नवमीच्या पावन मुहूर्तावर अंतर योग फाऊंडेशनतर्फे जीवन आमूलाग्र बदलणारा प्रभू श्रीरामांचा अद्वितीय उपदेश श्री राम गीता शिबीर ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी यांच्या दिव्य, रसाळ वाणीतून पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांनी आपल्या लाडक्या बंधू लक्ष्मणाला दिलेल्या अमूल्य उपदेशातील गूढ रहस्य सांगणार आहेत. यावेळी सुख-दुःख का येते?, मन शांत आणि स्थिर कसे ठेवावे?, कर्म आणि ज्ञान यात श्रेष्ठ काय?, अहंकार, मोह आणि भीतीवर विजय कसा मिळवावा? आदी सर्व प्रश्नांवर ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी आध्यात्मिक सद्गुरु, क्रांतिकारी महानायक रामबाण उत्तरदेणार आहेत. २६ मार्च २०२६ पासून हा कार्यक्रम सुरु होणार असून वेळ सायं. ६ ते ८:३० पर्यंत ऑनलाइन होणार आहे. कार्यक्रमाच्या आजच नोंदणीसाठी ७७१०९४८४६१ साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### मंदिराची दानपेटी फोडणारा ताब्यात

**रसायनी** : रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील कराडे खुर्द गावाजवळील बेलेंट्रा सोसायटीतील श्री गणेश मंदिराचा बंद दरवाजा उघडून मंदिरात ठेवलेले दानपेटीतील रक्कम चोरणाऱ्या चोरट्याच्या पोलिसांना मुसक्या आवळण्यात यश आले आहे.



यात्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस सुधीर मोरे, पोलीस शरद फरांदे पोलीस रणजितसिंह खराडे यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासून आरोपीला ताब्यात घेतले. आरोपी एकनाथ उर्फ इक्या सिताराम कातकरी (२५) पेरुची वाडी, चावणे येथील असून, त्याला मंदिरातील दानपेटीत १० रु, २०रु, ५०रु, २०० रु. दराच्या भारतीय चलनातील नोटा व नाणी चोरल्याचे त्याने कबूल केले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस पूनम शेळके अधिक तपास करीत आहेत.



### ‘खरात, चाकणकरांवर कारवाई करा’

**उरण** : अनेक महिलांवर अत्याचार करून त्यांचे शोषण करणाऱ्या अशोक खरात याच्यासोबत महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे अनेक व्हिडिओ समोर आले आहेत.त्यामुळे लवकरात लवकर रूपाली चाकणकरांना अटक करून सखोल चौकशी करण्यात यावी व अशोक खरातसारख्या लिंगपिसाटला कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्या सव्वालाखे यांच्या आदेशानुसार तसेच रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड महिला काँग्रेसच्या वतीने उरण मध्ये आंदोलन करण्यात आले.याप्रसंगी रायगड जिल्हा काँग्रेस महिला अध्यक्षा रेखा घरत, निर्मला पाटील, अश्रया शिवकर, सोनाली पाटील, मनिषा पाटील, जयश्री पाटील, प्रमीला पाटील, तुलसा पंडीत, गुलाब पाटील, आशा भोईर, सविता पाटील, ज्योती मढवी, सुमन मढवी, सुलेखा पाटील, चंपा पाटील, पार्वती पंडीत, वर्षा पाटील, इंदुबाई पाटील, जनाबाई पाटील, गुनीबाई पाटील उपस्थित होत्या.

### आदई गावातून महिला बेपत्ता

**पनवेल** : पनवेल तालुक्यातील आदई गाव परिसरातून २३ वर्षीय दिधीश्वरी सबुज मंडल या महिला बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

दिधीश्वरी मंडल या आपल्या राहत्या घरातून कोणालाही न सांगता बाहेर पडल्या असून, त्या अद्याप परत आलेल्या नाहीत. बेपत्ता महिलेचे वर्णन असे की, रंग गोरा, उंची सुमारे ५ फूट २ इंच, मध्यम बांधा, काळे केस असून, कानाजवळ जखमेचे निशाण आहे. घरातून बाहेर पडताना त्यांनी फिकट निळ्या रंगाचा चुडीदार ड्रेस व ओढणी परिधान केली होती, तसेच पायात भुरकट रंगाच्या सॅन्डल होत्या. त्यांच्याजवळ मोबाईल फोनही होता. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया पवार करत असून, संबंधित महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रकल्प स्थानिकांच्या मुळावर

- आदिवासी, स्थानिक संस्कृती नष्ट होणार?
- प्रकल्पाचा फायदा जनतेला की उद्योगपतींना?
- ॲड. कैलास मोरे यांचा शासनाला रोखठोक सवाल



● (छायाचित्र : संजय गायकवाड)



**| कर्जत | प्रतिनिधी |**

सध्या देशपातळीवर पर्यावरणाविषयी अनेक ठिकाणी शासनाच्या चुकीच्या काही धोरणांमुळे नागरिकांच्या हिताचा विचार न करता प्रकल्प लादले जात आहेत. अशा अनेक प्रकल्पांना जनतेचा कडाडून विरोध होत आहे. मात्र, या प्रकल्पांचे पेव हे रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातही उमटत असल्यामुळे कर्जतला निसर्गरम्य व पर्यटनस्थळ म्हणून लाभले नैसर्गिक वैभव व वरदान हे नष्ट होणार असल्याचे निदर्शनास येत असताना, या प्रकल्पांना कर्जतमधून कडाडून विरोध आहे. लवकरच प्रकल्प हटाव या मोहिमेंतर्गत जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा ॲड. कैलास मोरे यांनी दिला आहे.

कर्जत तालुक्यात सध्या शासनाकडून कोंढाणा, पोशीर, शीलार, टाटा, टोरंट, पाली भूतिवली यासारखे हे प्रकल्प लादले व सुरू आहेत. या प्रकल्पांमुळे कर्जत तालुक्यातील वने व वनसंपत्ती लोप पावून नष्ट होणार आहे. लाखो वनसंपदेची राख रांगोळी होणार असून, अंदाजे ४८,००० झाडे तुटली जाण्याची शक्यता आहे. एकट्या टोरंट प्रकल्पात वन विभागाची ६०० एकर जमीन जाणार आहे. मात्र, सध्या नागरीसेवेसाठी मुख्य दळणवळण समस्यांसाठी वन विभागाच्या जागेतून प्रलंबित रस्त्याकरिता जागा मिळविण्यासाठीच्या परवानगीकरिता सामान्य नागरिकांना कित्येक वर्षे हेलपाटे मारावे लागतात, तर केंद्र व राज्य शासन मात्र असे निरुपयोगी प्रकल्प जनतेच्या फायद्यासाठी न आणता केवळ यामध्ये उद्योगपतींचा फायदा बघत आहे काय? असा प्रश्न हा आता कर्जत तालुक्यातील प्रकल्पबाधित व पीडित जनतेमध्ये उपस्थित झाला आहे. आता थेट शासनाच्या विरोधात जनता दंड थोपटून जनआंदोलनातून एकत्र येणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. तर वर्ल्ड हेरिटेज असताना ही केंद्र व राज्य शासनाची भूमिका स्पष्ट दिसून येत नसल्याने मात्र केवळ या प्रकल्प भागांमधील पर्यावरण हे धोक्यात आणून धनदांडग्यांचे वर्चस्व वाढविण्याचा शासनाचा मनोदय आहे काय? असा प्रश्नदेखील प्रकल्पबाधित जनतेमध्ये उपस्थित होत आहे.

पर्यटकांसाठी येथील स्थानिक ४५०० भूमीपुत्रांनी छोटे-मोठे असे फॉर्महाऊस उभारलेले असून, हेच येथील लोकांच्या कुटुंबाच्या उपजीविकेचे एकमेव साधन आहे. जर येथील जंगले व पर्यटन उद्ध्वस्त झाले तर उपासमारीची वेळ स्थानिकांवर येणार आहे. वरील एकाही प्रकल्पाचा व धरणातील पाण्याचा स्थानिकांसह कर्जतकरांना फायदा नसल्याने येणारे पर्यटक काय सिमेंटची जंगले बघायला कर्जत तालुक्यात येणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कर्जत तालुक्यातील जैविकता, औषधी वनस्पती हा निसर्गाचा ठेवा व जागतिक वारसा असल्याने, येथील स्थानिकांच्या हाताला मिळणारे काम व त्यामधून त्यांना मिळणारा आर्थिक उत्पत्तीचा वारसा हा नष्ट करण्यासाठी शासन स्तरावरून याअगोदर झालेल्या जनसुनावणीत नागरिकांनी घेतलेल्या हरकतींना केराची टोपली दाखविली जात आहे. सध्याचे असलेले हवामान व वनसंपदा ही नष्ट झाल्यावर उष्णतेचे प्रमाण वाढेल. असे अनेक संभाव्य धोकेदेखील यामध्ये दडलेले आहेत.

कर्जतचे वैभव अबाधित राहावे, येथील निसर्ग व जैविकता कायम राहावी व तालुक्यातील असलेल्या आदिवासी व स्थानिक संस्कृतींचा नाश होऊ नये याकरिता जनता, व पर्यावरणप्रेमी यांनी शासनाच्या विरोधात तीव्र चिंता व्यक्त केलेली असून, जर याबाबतीत शासनाने जनतेच्या भावना जाणून घेऊन यावर तोडगा काढून उद्योगपतींकरिता उभे होणाऱ्या प्रकल्पांचा गाशा गुंडाळला नाही तर याविरोधात जनआंदोलन उभारले जाईल, अशी स्पष्ट भूमिका ही ॲड. कैलास मोरे यांनी मांडली असून, तालुक्यातील सामाजिक क्षेत्रातील सर्व घटकांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

## पनवेल पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात परिमंडळ ०३ पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते व सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली ऑल आऊट व कोंबिंग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले. यादरम्यान डी.बी. मार्ग पोलिसांनी आरोपी राकेश विश्वनाथ महामुनकर यास ताब्यात घेतले.

यामध्ये एनडीपीएस भारतीय हत्यार कायदा, दारूबंदी अधिनियम, रहदारीस अडथळा निर्माण करणे, गुटका व तंबाखू जन्य पदार्थबंदीप्रमाणे एकूण १० गुन्हे नोंदवण्यात आले. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील हिस्ट्री सीटर एकूण ११ चेक केले. त्यातील सहा मिळून आले तसेच गुंड नऊ चेक केले असता तीन मिळून आले. तसेच एकूण पाच वॉरंट बजावणी, नऊ समन्सची बजावणी, सात पाहिजे व फरारी आरोपी, चार लॉज चेकिंग करण्यात आले. त्याचप्रमाणे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दोन ठिकाणी नाकाबंदी नेमण्यात आली होती. यामध्ये नाकाबंदीदरम्यान ५७ वाहनांची पाहणी करून दहा वाहनांवर कारवाई करण्यात आली. सदर ऑल आऊट ऑपरेशनकरिता वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह आठ अधिकारी आणि ४२ पोलीस अंमलदार हजर होते.

## अतिउच्च दाबाची वीजवाहिनी बेकायदा

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुक्यातील निजामपूर परिसरात खासगी कंपनीच्या फायद्यासाठी बेकायदेशीररीत्या टाकल्या जात असलेल्या अतिउच्च दाबाच्या वीजवाहिनीविरोधात ग्रामस्थांनी तीव्र आक्रमक भूमिका घेतली आहे. नागरिकांची संमती न घेता आणि कायदेशीर प्रक्रिया न पाळता सुरू असलेले हे काम तात्काळ बंद करावे, अन्यथा न्यायालयीन लढा उभारण्याचा इशारा ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.



माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागातील कोस्ते बुद्रुक येथे खासगी जे.टी.एल. कंपनीच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून अतिउच्च दाबाची वीजवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र, हे काम पूर्णपणे बेकायदेशीर असून स्थानिक नागरिकांची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

याप्रकरणी निजामपूर परिसरातील ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने माणगाव उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस ठाणे तसेच वीज वितरण कंपनीकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. स्थानिक नागरिक सुधीर पवार यांच्या मालकीच्या खासगी जमिनीमधून तसेच इतर ग्रामस्थांच्या जमिनीमधून ही वीजवाहिनी नेली जात आहे. संबंधित जमिनी औद्योगिक वापरासाठी खरेदी करण्यात आल्या असून, या प्रकल्पामुळे भविष्यात जमीन वापरावर गंभीर मर्यादा येण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय पानस्पे येथील पाझर तलावामध्येही वीजवाहिनीचे खांब उभारण्यात येत असल्याने जीविताला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तलाव परिसरात मच्छिमारी करणारे आदिवासी, पाणी वापरणाऱ्या महिला, जनावरे आणि लहान मुले यांच्यावर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, प्रस्तावित दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर ही वीजवाहिनी भविष्यातील विकास कामांनाही अडथळा ठरू शकते, असा मुद्दाही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## ग्रामस्थांची माळरानावर लाकूडफाट्यासाठी वणवण

- इंधन टंचाईचा निसर्गाला फटका
- पर्यावरणासह मानवी आरोग्यावरही टांगती तलवार

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

इराण आणि इस्रायलमधील वाढत्या तणावाचा थेट परिणाम आता रायगडच्या ग्रामीण आणि निमशहरी भागातीलस्वयंपाकघरांवरदिसूलागला आहे. व्यापारी गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने आणि घरगुती गॅसची उपलब्धता कमी झाल्याने नागरिकांना पुन्हा एकदा पारंपरिक चुलींकडे वळावे लागत आहे. मात्र, या अघोषित इंधन टंचाईमुळे रायगडच्या समृद्ध वनसंपदेचा ऱ्हास होत असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. शिवाय, सध्या लाकूडफाट्याचे भावदेखील वाढले आहेत.

रायगड जिल्हा हा आपल्या वनसंपदेसाठी आणि जैवविविधतेसाठी ओळखला जातो. मात्र, गॅसअभावी हॉटेल व्यावसायिक आणि सामान्य गृहिणींना आता लाकूडफाट्याशिवाय पर्याय उरलेला नाही. कडाक्याच्या उन्हात लाकूड गोळा करण्यासाठी महिला व पुरुषांना तसेच वृद्ध आणि लहानग्यांनादेखील जंगलात रानोमाळ भटकावे लागत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असून, पर्यावरणाचे संतुलन बिघडण्याची भीती निर्माण झाली आहे.



> मुळातच हवामान बदलाचे संकट समोर असताना, इंधन टंचाईमुळे पुन्हा लाकूड फाट्याकडे वळणे हे पर्यावरणासाठी अत्यंत घातक आहे. जंगलतोडीमुळे केवळ झाडे कमी होत नाहीत, तर त्यावर अवलंबून असणारी जैवविविधताही धोक्यात येते. प्रशासनाने इंधनाचा पर्यायी पुरवठा सुरळीत करणे आवश्यक आहे, अन्यथा वर्षानुवर्षे जपलेली वनसंपदा नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.
>
> – शंतनू कुवेसकर, पर्यावरण अभ्यासक, माणगाव

**निसर्गावर कुऱ्हाड, जैवविविधता धोक्यात**

रायगड जिल्हा हा वनसंपदेने नटलेला असला तरी सध्याच्या इंधन टंचाईमुळे या निसर्गावर अघोषित कुऱ्हाड चालवली जात आहे. जळाऊ लाकडासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने वनक्षेत्राचे प्रमाण वेगाने घटण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम जंगलातील पक्ष्यांच्या घरट्यांवर व वन्यजीवांच्या अधिवासावर आणि अन्नावर होऊन निसर्गाचे संतुलन बिघडण्याची शक्यता वर्तवली आहे.

**गॅस मिळेना, धूर सोसवेना!**

पालीतील लता माळी या गृहिणीने सांगितले की, इंधन टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिक सध्या दुहेरी संकटात सापडले आहेत. गॅस सिलिंडर उपलब्ध नसल्याने नाईलाजास्तव अनेक गृहिणींना भरउन्हात लाकडे गोळा करण्यासाठी वणवण करावी लागत आहे. चुलीवर स्वयंपाक करताना निघणाऱ्या धुरामुळे डोळ्यांचे विकार आणि श्वसनाचे त्रास जाणवू लागले आहेत.

केवळ पर्यावरणाचा ऱ्हासच नव्हे, तर चुलीच्या धुरामुळे मानवी आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहेत. तासन्तास धुराच्या सान्निध्यात राहिल्याने डोळ्यांचे विकार, श्वसनाचे त्रास आणि फुफ्फुसाचे आजार बळावण्याची शक्यता वर्तवली आहे. विशेषतः ग्रामीण भागातील महिला या धुराच्या थेट संपर्कात येत असल्याने त्यांच्या आरोग्यासाठी हा मोठा धोका मानला जात आहे.

## कर्जत आगाराची समितीकडून पाहणी

**| कर्जत | प्रतिनिधी |**

‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक’ अभियानांतर्गत सर्व्हेक्षण समितीने कर्जत एसटी आगाराला अचानक भेट देत कामकाजाची पाहणी केली. आगाराच्या स्वच्छता व व्यवस्थापनाबद्दल समाधान व्यक्त करत समितीने पुढील सुधारण्यासाठी महत्त्वाच्या सूचना केल्या.

कर्जत येथील एसटी आगाराची ‘स्वच्छ, सुंदर बस स्थानक’ अभियानांतर्गत सर्व्हेक्षण समितीने मंगळवारी सकाळी अचानक पाहणी केली. या भेटीत आगार परिसर, प्रवासी सुविधा तसेच कार्यालयीन कामकाजाची सखोल तपासणी करण्यात आली.



पालघर विभागाचे विभाग नियंत्रक कैलास पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समिती दुपारी कर्जत आगारात दाखल झाली. समितीत विजय पवार, विजय मांडे तसेच प्रवासी प्रतिनिधी पुंडलिक भोईर यांचा समावेश होता. यावेळी सहाय्यक वाहतूक नियंत्रक महादेव पालवे यांनी समितीचे स्वागत केले. समितीने वाहतूक नियंत्रक दीपक देशमुख, विलास बागुल आणि वसंत बागुल यांच्या उपस्थितीत संपूर्ण आगार परिसराची पाहणी केली. नेरळ बस थांब्याचीही पाहणी करण्यात आली. यावेळी आगार व्यवस्थापकांचे निवासस्थान आणि इमारतींच्या दुरुस्तीबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. कमी मनुष्यबळ असूनही आगाराचे कामकाज चांगल्या प्रकारे सुरू असल्याचे नमूद करत समिती सदस्यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. समिती अध्यक्ष कैलास पाटील यांनी प्रवासी संख्या वाढविण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले. तर, सहाय्यक वाहतूक नियंत्रक महादेव पालवे यांनी नवीन एसटी गाड्यांमुळे प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

## महिलेसह चिमुकला बेपत्ता

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल परिसरातील सुकापूर येथून एक महिला व तिचा चार वर्षांचा मुलगा बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. पुष्पा मदन विश्वकर्मा (२८) या आपल्या राहत्या घरातून मुलगा प्रिन्स (४) याला सोबत घेऊन निघून गेल्या. त्यानंतर त्या अद्याप घरी परतलेल्या नाहीत. घरगुती वादातून त्या निघून गेल्याची प्राथमिक माहिती असून, त्यांचा शोध सुरू आहे. संबंधित महिला हिंदी व नेपाळी भाषा बोलते, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

## सहा ग्रामपंचायतींसाठी पोटनिवडणूक

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींमधील रिक्त जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, एप्रिल महिन्यात ही प्रक्रिया पार पडणार आहे. त्यामुळे स्थानिक राजकारण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

तालुक्यातील एकदरा, राजपुरी, चोरढे, वेळस्ते, काशीद आणि मांडला या सहा ग्रामपंचायतींमधील रिक्त सदस्यपदांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. एप्रिल महिन्यात ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार असून, त्यानंतर मे महिन्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. तहसील कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ७ एप्रिल ते १३ एप्रिलदरम्यान पोटनिवडणुकीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. २८ एप्रिलला मतदान होणार आहे.

**॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥**



**स्व. प्रभाकर गोविंद पाटील**

जन्म : ०४/०५/१९३८ | मृत्यू : १८/०३/२०२६

सहवास जरी सुटला, स्मृती सुगंधी येत राहील
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुमची येत राहील.

**दशक्रीया विधी**

शुक्रवारी, दि. २७/०३/२०२६
स्थळ : रामनाथ स्मशानभूमी
वेळ : सकाळी ८ वाजता

समस्त पाटील परिवार

निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी | पेव्हर ब्लॉकबाबत नगरपरिषदेकडे मागितली दाद

## अश्वपाल संघटनेचे ठिय्या आंदोलन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान शहरात पेव्हर ब्लॉकवरून घोड्यांचे पाय घसरून अपघात होतात, त्याचवेळी उताराच्या ठिकाणी घोड्यांना होणारे अपघात टाळण्यासाठी माथेरान अश्वपाल संघटना यांच्याकडून दाद मागण्यात येत होती. मात्र, माथेरान नगरपरिषद कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने आज माथेरानमधील अश्वपालक यांनी ठिय्या आंदोलन केले. यावेळी माथेरान नगरपरिषद यांनी चर्चा करताना एप्रिल महिन्यात संनियंत्रण समितीची बैठक होणार असून, त्या बैठकीत अश्वपाल यांचा विषय मांडला जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे.



माथेरानमधील पेव्हर ब्लॉकबाबत अश्वपाल संघटनेचे अध्यक्ष आशा कदम, सचिव विकास रांजणे, माजी अध्यक्ष शैलेश शिंदे तसेच मुलवासी अश्वपाल संघटनेचे पदाधिकारी यांनी मंगळवारी श्रीराम चौकात ठिय्या आंदोलन केले. सर्वोच्च न्यायालयाने ई-रिक्षा व क्ले पेव्हर ब्लॉकसंदर्भात दिलेला निर्णयाची अंमबजावणी करावी, अशी मागणी केली आहे.त्यात राज्य सरकारला दस्तुरी नाका ते शिवाजी महाराज पुतळा यादरम्यानच्या रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक्स (मातीचे पेव्हर ब्लॉक्स) बसवण्याची परवानगी देण्यात आली आहे. हे ब्लॉक्स बसवताना, त्यांच्या खाली कोणताही काँक्रिटचा थर नसावा, आयआयटी मुंबईने शिफारस केलेल्या इतर उपाय योजनांची अंमलबजावणी करावी. नीरी या संस्थेने दिलेल्या शिफारसींचीही अंमलबजावणी करण्यात यावी, दस्तुरी नाका ते शिवाजी महाराज पुतळा या मुख्य रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक्सना परवानगी असली, तरी अंतर्गत रस्त्यांवर आणि कोणत्याही परिस्थितीत ट्रेकिंग मार्गांवर पेव्हर ब्लॉक्स बसवले जाऊ नयेत. या उपाययोजनांमुळे मुख्य रस्त्यावर ई-रिक्षांची हालचाल सुलभ होईल आणि त्याच वेळी अंतर्गत व ट्रेकिंग मार्ग केवळ ट्रेकर्स आणि घोड्यांवर अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठी राखीव राहतील याची खात्री होईल, यामुळे हातगाडी ओढणारे आणि घोड्यांवर अवलंबून असणारे लोक यांच्या हक्कांचा समतोल राखला जाईल, असे निर्देश आहेत. दरम्यान, आंदोलनाची दखल घेऊन मुख्याधिकारी राहुल इंगळे आणि नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, उपनगराध्यक्ष संतोष शेलार यांनी भेट घेऊन आंदोलकांशी चर्चा केली. त्यावेळी मुख्याधिकारी यांनी तुमचे म्हणणे एप्रिलमध्ये होणाऱ्या संनियंत्रण समितीच्या बैठकीत मांडण्याचे आश्वासन दिले.

# मोदींना साक्षात्कार

एकीकडे ट्रम्प इराणमधील युध्दातून बाहेर पडण्याची संधी शोधत असताना, इकडे भारतात नरेंद्र मोदी यांना अखेर भारताची अवस्था बिकट आहे याचा साक्षात्कार झाला आहे. इतके दिवस आखाती युध्दाचा आपल्यावर काहीच परिणाम होणार नाही, सर्व काही मजेत चालू आहे असे भासवण्याचा मोदी सरकारचा प्रयत्न होता. एकीकडे लोक गॅससाठी रांगा लावत होते, देशात अनेक ठिकाणी गॅसचे वितरण पोलिस बंदोबस्तात करावे लागत होते आणि तरीही देशात गॅसचा तुटवडा नाहीच अशी सरकारची बतावणी चालू होती. हॉटेलवाले आणि उद्योगधंदे यांना लागणाऱ्या गॅसच्या पुरवठ्यात ५० टक्क्यांपर्यंत कपात करण्यात आली आहे. पोलाद, टाइल्स निर्मिती, इंजिनिअरिंग, वाहन उद्योग अशा सर्वांना याचा फटका बसला आहे. तरीही मोदी सरकारच्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे ते हे कबूल करायला तयार नव्हते. आता मात्र आखाती युध्दाची स्थिती चिंताजनक आणि भारतासाठी अत्यंत आव्हानात्मक आहे हे त्यांना कबूल करावे लागले आहे. इतके दिवस राहुल गांधी आखाती युध्दावर संसदेत चर्चा करू मागत होते. त्यावेळी त्यांना अडवण्यात आले. अखेर सोमवारी मोदींना याबाबत लोकसभेत निवेदन करावे लागले व कोविडच्या काळातल्या आठवणी काढाव्या लागल्या. कोरोनाच्या वेळी देशाची अर्थव्यवस्था ठप्प झाली होती. त्यावेळी देशाने जसा एकदिलाने मुकाबला केला तसाच आताही करण्याची वेळ आली आहे असे मोदी म्हणाले. कोरोनाच्या आरंभीच्या काळात मोदी व भाजपवाले हा काही विशेष रोग नाही असे वागत होते. त्याच काळात मोदींनी ट्रम्प यांना भारतात बोलावून त्यांचे स्वागत केले होते. नंतर कोरोना असतानाही बंगालमध्ये प्रचाराच्या मोठमोठ्या सभा घेतल्या होत्या. त्यावेळी अचानक एका रात्रीत टाळेबंदी लागू करून मोदी सरकारने लोकांचे जिणे हराम केले होते. आता खुद्द मोदी कोरोना काळाची आठवण काढत आहेत याचा अर्थ अर्थव्यवस्थेला जबर फटका बसणार आहे असे समजायला हवे. देशातील गुंतवणूक पुढच्या वर्षभरात २५ टक्क्यांनी कमी होईल असा एक अहवाल आजच आला आहे. शिवाय गेल्या सलग सहा महिन्यांपासून परकीय गुंतवणूकदार भारतातून आपली गुंतवणूक काढून घेत आहेत. यामुळे इथले रोजगार घटणार आहेत. शिवाय, तेल व गॅसचे दर नजीकच्या काळात गगनाला भिडणार आहेत. मोदी सरकारने आता तरी जनतेला विश्वासात घेऊन सर्व गोष्टी उघड करतील व योग्य ते उपाय योजतील अशी अपेक्षा आहे.

### ट्रम्प यांचे टाईमप्लीज

दरम्यान, लहान मुले खेळताना टाईम प्लीज किंवा मराठीत टॅम्पिज, अर्थात छोटासा ब्रेक घेतात. ट्रम्प यांनी आखाती युध्दामध्ये असाच एकतर्फी विराम घेतला असून पाच दिवस इराणच्या उर्जा प्रकल्पांवर हल्ले करणार नाही असे जाहीर केले आहे. इराणशी चर्चा चालू असून येत्या आठवड्याभरात काहीतरी तोडगा निघेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. एरवी चर्चा चालू आहे किंवा तोडगा निघेल अशी भाषा अमेरिकेच्या कोणाही अध्यक्षांनी केली असती तर त्यावर जगाने सहज विश्वास ठेवला असता व आनंदही व्यक्त केला असता. पण ट्रम्प हा अत्यंत बेभरवशाचा नेता आहे. तो खुशाल खोटे बोलू शकतो. शिवाय, त्याचे आजचे बोलणे उद्यापर्यंत कायम टिकेल याची खात्री तो स्वतःही देऊ शकत नाही. इतका खोटारडा, बेमुर्वत, मंत्रचळा, लहरी आणि अनेकदा मूर्खासारखा वागणारा नेता जगाच्या इतिहासात झाला नसावा. अमेरिकेची सगळी लष्करी व आर्थिक ताकद त्याच्या हातात आहे म्हणूनच जग त्याला सहन करते. अन्यथा, जगाने त्याच्या राजकारणाचा केव्हाच निकाल लावला असता. काल-परवाच ट्रम्प यांनी इराणला ४८ तासांचा इशारा दिला होता. होर्मूझच्या आखातातील वाहतूक सुरळीत न झाल्यास इराणच्या वीज, गॅस व तेल प्रकल्पांवर हल्ले केले जातील असे त्यांनी जाहीर केले होते. त्यामुळे सर्व जग श्वास रोखून आता युध्द वाढणार अशा चिंतेने बसले होते. तितक्यातच ट्रम्प यांचा हा छोटासा ब्रेक आला आहे. होर्मूझच्या आखातावर इराणचा कबजा आहे. तेथून होणारी तेल व गॅसची वाहतूक बंद करून इराणने सर्व जगाची कोंडी केली आहे. अमेरिकेच्या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी युध्दात त्याला हा पर्याय निवडण्याखेरीज अन्य पर्यायही नाही. कारण, जगाचे नाक दाबले तरच तोंड उघडू शकेल हे इराणला ठाऊक आहे. त्यानुसार, भारत, जपान, चीन यांच्यासह सर्वच देशांमधील गॅस इत्यादींची आवक बंद पडली आहे. त्याचे परिणाम त्या त्या देशात जाणवू लागले आहेत. त्यामुळे बाजार कोसळले होते अमेरिकेसह सर्व अर्थव्यवस्थांना चटके बसू लागले होते. या सगळ्याचा दबाव आल्यानेच ट्रम्प यांना काहीही करून या युध्दातून बाहेर पडणे आता गरजेचे झाले आहे.

### मूर्ख वीराची मूर्ख स्वप्ने

दोन-चार दिवसात युध्द करून इराणला खलास करू आणि अमेरिकी जनतेपुढे आपण विजयी वीर म्हणून मिरवू असे ट्रम्प यांना वाटत होते. ते स्वप्न मूर्खपणाचे होते हे पुरेसे सिध्द झाले आहे. यामध्ये इस्रायलने मात्र आपल्या शत्रूला म्हणजे इराणला खच्ची करण्याचे समाधान मिळवले. ट्रम्प यांनी माघार घेतली तरी इस्रायलचे इराणवरचे हल्ले चालू राहतील. गेल्या वर्षी गाझा पट्टीत युध्दबंदीचा प्रस्ताव केल्यानंतरही इस्रायलने पॅलेस्टिनी लोकांवर हल्ले चालूच ठेवले. आतादेखील लेबनॉनवर त्याचे क्रूर हल्ले सुरु आहेतच. त्याला अटकाव करणारे कोणीही नाही. या स्थितीत ट्रम्प यांनी कितीही विरामचे प्रस्ताव ठेवले तरी इराण त्यावर विश्वास ठेवणे शक्य नाही. शिवाय खामेनींसह बरेच मोठे नेते मारले गेलेले असल्याने इराणला आता आणखी गमावण्यासारखे काही शिल्लक नाही. त्यामुळे उद्या मनात आले तर तो आपल्याच शेजारी असलेल्या कतार, कुवेत, इराक, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, ओमान, बहारीन या देशांमधल्या तेल व गॅसच्या खाणींवर हल्ले करू शकतो. यापूर्वी त्याने असे हल्ले करून हम तो डूबेंगे सनम, तुझको भी लेकर डूबेंगे या म्हणण्याचा प्रत्यय दिला आहे. यापूर्वी कतारच्या गॅस प्रकल्पावर हल्ला झाला तेव्हा त्यातून पुढच्या पाच वर्षात भरून येणार नाही असे नुकसान झाले. सौदी वगैरेंना आपल्या खाणी किंवा तेलशुध्दीकरण प्रकल्प बंद करून ठेवावे लागले आहेत. यामुळे तेलाचे भाव बॅरलला शंभर डॉलरच्या पलिकडे गेले आहेत. त्यामुळे इराणवर हल्ले चालू ठेवणे हे किती घातक आहे हे ट्रम्प यांच्या लक्षात आले आहे. दुसरीकडे होर्मूझच्या आखाताचा कबजा करण्यासाठी नाटो देशांनी मिळून आक्रमण करूया असे आवाहन यापूर्वी ट्रम्प यांनी करून झाले आहे. पण इतके दिवस ज्या ब्रिटन आणि फ्रान्सला ट्रम्प शिव्या घालत होते ते अमेरिकेच्या मदतीला येणे शक्यच नव्हते. त्यामुळे ट्रम्प यांना नाटोच्या मदतीखेरीज आपण किती हतबल आहोत याचीही पहिल्यांदाच जाणीव झाली आहे.

विचार

# बिहारची राजकीय समीकरणे बदलणार

***नितीशकुमार यांनी केंद्रीय राजकारणाची वाट धरल्यामुळे बिहारमध्ये पहिल्यांदाच भाजपचा मुख्यमंत्री होणार आहे. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांच्याबाबतीत जे झाले, तेच नितीशकुमार यांच्यासोबत झाले आहे. फरक आहे तो भाजप आणि संयुक्त जनता दलाने जिंकलेल्या जागांमध्ये. नितीशकुमार यांनी बिहारमध्ये अलिकडे उत्तम यश मिळवले असले, तरी भाजपने त्यांना बिहारच्या राजकारणातून हुशारीने दूर नेले आहे.***



**राही भिडे**

नितीशकुमार यांचे नाव गेल्या दोन दशकांपासून बिहारच्या राजकारणात स्थैर्य, सामाजिक समतोल आणि प्रशासकीय बदल यांचे प्रतीक मानले जाते; परंतु आता त्यांच्या राजकीय प्रवासाने एका नव्या वळणावर प्रवेश केला आहे. केंद्राच्या राजकारणात त्यांची संभाव्य एंट्री आणि त्यानंतर बिहारमध्ये निर्माण होणारे राजकीय समीकरण हे केवळ राज्यापुरते मर्यादित नसून राष्ट्रीय पातळीवरील राजकारणालाही आकार देणारे ठरू शकते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा, बिहारमधील त्यांच्या कामगिरीचा आणि त्यांच्या संभाव्य केंद्रीय प्रवेशामुळे राज्यातील राजकारणावर होणाऱ्या परिणामांचा विचार करणे आवश्यक ठरते. १९९० च्या दशकात लालू प्रसाद यादव यांच्या नेतृत्वाखाली बिहारचे राजकारण सामाजिक न्यायाच्या राजकारणाने व्यापले होते. त्या काळात राज्यातील राजकीय संघर्ष प्रामुख्याने सामाजिक प्रतिनिधित्व, जातीय समीकरणे आणि सत्तेतील सहभाग या मुद्द्यांभोवती फिरत होता. या राजकारणात नितीशकुमार यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. संयुक्त जनता दल या पक्षाच्या माध्यमातून त्यांनी प्रशासनिक सुधारणा, विकास आणि कायदा-सुव्यवस्था या मुद्द्यांना राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. २००५ मध्ये त्यांनी भारतीय जनता पक्षसोबत युती करत बिहारमध्ये सत्ता स्थापन केली आणि तेव्हापासून राज्याच्या राजकारणात एक नवा अध्याय सुरू झाला. नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली बिहारमध्ये अनेक क्षेत्रांमध्ये बदल घडून आले. एके काळी गुन्हेगारी, अपुरी पायाभूत सुविधा आणि प्रशासनिक शिथिलतेसाठी ओळखले जाणारे राज्य हळूहळू बदलू लागले.

२००५ पूर्वी गुन्हेगारी आणि अपहरणाच्या सातत्यपूर्ण घटनांमुळे उद्योग आणि गुंतवणूकदार राज्यापासून दूर राहात होते. नितीशकुमार सरकारने पोलिस व्यवस्था मजबूत करून गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. जलदगती न्यायालये, गुन्हेगारी प्रकरणांची जलद सुनावणी आणि प्रशासनिक शिस्त यामुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली. राज्यभर रस्त्यांचे जाळे वाढवणे, पुलांचे बांधकाम आणि ग्रामीण भागात संपर्क वाढवणे ही त्यांच्या सरकारची प्रमुख उपलब्धी मानली जाते. रस्ते सुधारल्यामुळे राज्यातील व्यापार, वाहतूक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. मुलींच्या शिक्षणासाठी सायकल योजना, पोशाख योजना आणि शिष्यवृत्ती यांसारख्या कार्यक्रमांमुळे मुलींच्या शाळेत जाण्याचे प्रमाण वाढले. सामाजिक न्याय आणि विकास यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न त्यांच्या धोरणांमध्ये दिसून येतो. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना मोठ्या प्रमाणावर आरक्षण देऊन राजकारणात सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे ग्रामीण स्तरावर महिलांचे नेतृत्व पुढे आले. अलीकडच्या काळात नितीशकुमार यांचे नाव पुन्हा एकदा राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आले आहे. अनुभवामुळे आणि दीर्घ राजकीय प्रवासामुळे केंद्राच्या राजकारणात त्यांना महत्त्वाची भूमिका मिळू शकते. यापूर्वी वाजपेयी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात ते रेल्वेमंत्री होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडी तसेच संयुक्त पुरोगामी आघाडीच्या काळात त्यांनी देशात समन्वयकाची भूमिका बजावली होती. भाजपबरोबर राहूनही त्यांनी त्यांची धर्मनिरपेक्षतेची प्रतिमा कायम राखली होती.

राष्ट्रीय राजकारणात त्यांचा प्रवेश अनेक कारणांनी महत्त्वाचा ठरू शकतो. ते संघराज्य व्यवस्थेतील राज्यांच्या हितांचे प्रतिनिधित्व करू शकतात. सामाजिक समतोल आणि विकासाचा अनुभव असलेले नेते म्हणून त्यांची प्रतिमा तयार झाली आहे. नितीशकुमार सक्रियपणे केंद्रीय राजकारणात गेल्यास बिहारच्या राजकारणात मोठा बदल होऊ शकतो. गेल्या दोन दशकांपासून बिहारच्या राजकारणात ते केंद्रबिंदू बनून राहिले आहेत. त्यांच्या अनुपस्थितीत नेतृत्वाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. भारतीय जनता पक्ष गेल्या काही वर्षांमध्ये बिहारमध्ये आपली ताकद वाढवत आहे. नितीशकुमार केंद्रीय राजकारणात गेल्यास राज्यात प्रथमच भाजपला स्वतंत्रपणे सत्ता मिळवण्याची संधी निर्माण होऊ शकते. बिहारचे राजकारण परंपरेने जातीय समीकरणांवर आधारित राहिले आहे. नितीश कुमार यांच्या अनुपस्थितीत हे समीकरण पुन्हा बदलण्याची शक्यता आहे. भाजपने गेल्या काही निवडणुकांमध्ये बिहारमध्ये आपला प्रभाव वाढवला आहे. संघटनात्मक ताकद, राष्ट्रीय नेतृत्वाचा प्रभाव आणि केंद्रातील सत्ता या घटकांमुळे पक्षाला राज्यात मजबूत आधार मिळत आहे. नितीशकुमार सक्रिय राज्य राजकारणातून दूर गेले, तर भाजपला स्वतंत्रपणे नेतृत्व करण्याची संधी मिळू शकते. त्यामुळे बिहारमध्ये प्रथमच भाजपच्या नेतृत्वाखाली स्थिर सरकार निर्माण होण्याची शक्यता आहे. गेल्या दशकापासून भाजपने पद्धतशीरपणे केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त जनता दल (युनायटेड) हा पक्ष टिकून राहिला; परंतु त्यांच्या अनुपस्थितीत पक्षासमोर अनेक आव्हाने उभी राहू शकतात.

आजघडीला संयुक्त जनता दलामध्ये नितीशकुमार यांच्याइतका प्रभावी नेता सध्या दिसत नाही. त्यामुळे ग्रामीण आणि सामाजिक गटांमध्ये असलेला पाठिंबा टिकवणे कठीण ठरू शकते. नितीशकुमार यांच्या केंद्रीय राजकारणातील प्रवेशामुळे बिहारमध्ये तीन प्रकारचे बदल दिसू शकतात. त्यात नवे नेतृत्व पुढे येणे, भाजपचा प्रभाव वाढणे आणि प्रादेशिक पक्षांच्या पुनर्रचनेमुळे राज्यातील राजकारण अधिक स्पर्धात्मक आणि बहुआयामी होणे असे बदल घडू शकतात. नितीशकुमार यांचा अनुभव आणि 'सुशासनबाबू'ची प्रतिमा राष्ट्रीय पातळीवरही महत्त्वाची ठरू शकते. त्यांनी अनेक वेळा वेगवेगळ्या राजकीय आघाड्यांमध्ये भूमिका निभावली आहे. त्यामुळे ते केंद्रातील सत्तासमीकरणात समन्वयकाची भूमिका निभावू शकतात. त्यांचा राजकीय प्रवास हा भारतीय संघराज्य राजकारणातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. बिहारच्या सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनात त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी केंद्रीय राजकारणात सक्रिय भूमिका स्वीकारल्यास बिहारच्या राजकीय रचनेवर मोठ्या प्रमाणात फरक पडू शकतो. नितीशकुमार यांच्या पुढील राजकीय निर्णयावर राज्याच्या राजकीय भविष्याची दिशा मोठ्या प्रमाणात अवलंबून असेल. बिहारची राजकीय स्थिती सध्या वेगवान हालचाली आणि राजकीय तर्कवितर्कांच्या टप्प्यातून जात आहे. नितीशकुमार सध्या सीमांचल आणि कोसी या भागांच्या दौऱ्यावर आहेत आणि हा दौरा २६ मार्चपर्यंत चालणार आहे. या दौऱ्यानंतर, म्हणजेच ८ किंवा ९ एप्रिलच्या सुमारास ते मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊ शकतात.

पुढील काळात नितिशकुमार राज्यसभेचे सदस्य म्हणून नव्या भूमिकेत दिसू शकतात. त्यासाठी त्यांना बिहार विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागेल. संवैधानिकदृष्ट्या राज्यसभेचे सदस्य झाल्यानंतरही मुख्यमंत्रिपदावर राहणे शक्य आहे; मात्र ते स्वेच्छेने पद सोडून नव्या नेतृत्वासाठी मार्ग मोकळा करू शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. हे केवळ सत्तांतर नसून आगामी काळात संयुक्त जनता दलाच्या रणनीतीमध्ये आणि नेतृत्वात सुरू होणाऱ्या नव्या अध्यायाचे संकेत मानले जात आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांचे पुत्र निशांतकुमार यांनी संयुक्त जनता दलात प्रवेश प्रवेश केला आहे. नव्या राजकीय सूत्रानुसार संयुक्त जनता दलात नितीशकुमार यांचे उत्तराधिकारी म्हणून निशांतकुमार यांचे नाव आघाडीवर असल्याचे म्हटले जात आहे. दुसरीकडे, त्यांचे निकटवर्तीय आणि ज्येष्ठ नेते विजयकुमार चौधरी यांचे नावही चर्चेत आहे. दुसऱ्या बाजूला भाजप या नव्या राजकीय घडामोडींमध्ये निर्णायक भूमिका घेण्याच्या तयारीत आहे. पुन्हा एकदा गृह खाते भाजपकडेच राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत भाजपच्या काही दिग्गज नेत्यांची नावे चर्चेत आहेत. त्यामध्ये सम्राट चौधरी, संजीव चौरसिया आणि प्रेमकुमार यांची नावे पुढे येत आहेत. एकूणच येणारे काही आठवडे बिहारच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. राजकीय पटकथा प्रत्यक्षात उतरली, तर या राज्यातील सत्तेचे स्वरूपच नव्हे, तर संपूर्ण राजकीय समीकरण बदलू शकते. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये होणाऱ्या राजकीय निर्णयांकडे संपूर्ण बिहारचे लक्ष लागले आहे.

चर्चा आजची

# संतपरंपरेच्या महाराष्ट्राची लाज घालवणारा भोंदू खरात!

**राकेश लोहार**

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आपल्या महाराष्ट्राची, महाराष्ट्राच्या संस्कृतीची, संतपरंपरेची आणि संतांच्या विचारांची लाज घालवली आहे. रोजचा दिवस उजाडतोय तो या भोंदू खरातच्या नव्या-नव्या कांडाने. असल्या घाणेरड्या विकृतीमुळे कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा, असा प्रश्न सर्वसामान्यांना सतावत आहे. खरं सांगायचं तर, 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए' हे वाक्य आता फक्त एखाद्या सिनेमातील संवाद राहिलेला नाही; ते आजच्या महाराष्ट्राच्या वास्तवाचं भयाण चित्र बनलं आहे. नाशिकचा भोंदू अशोक खरात हा त्याचा जिवंत पुरावा ठरत आहे. पण, खरी भीती त्या एका व्यक्तीची नाही, तर त्या संपूर्ण व्यवस्थेची आहे; जी त्याच्या पायाशी जाऊन नतमस्तक झाली. त्यामुळे इथे एक प्रश्न उभा राहतोय, तो म्हणजे, खरातने लोकांना झुकवलं, की लोक स्वतःच त्याच्यासमोर झुकले? कारण जेव्हा सत्ताधारी, मंत्री, वरिष्ठ अधिकारी, सेलिब्रिटी आणि प्रभावशाली व्यक्ती एखाद्या भोंदूच्या चरणी लोटांगण घालतात, तेव्हा ती त्यांची वैयक्तिक श्रद्धा राहात नाही, तो सार्वजनिक व्यवस्थेचा पराभव ठरतो. ही केवळ अंधश्रद्धा नाही, हा सत्तेचा गैरवापर आहे. हा जनतेच्या विश्वासाचा घात आहे. या प्रकरणात सर्वात संतापजनक बाब म्हणजे; शासन यंत्रणाच त्याच्या सेवेसाठी वाकवली गेली. मंत्रिमंडळाच्या पातळीवर निर्णय घेतले गेले, सरकारी जीआर काढले गेले, आणि दुष्काळाने होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडचं पाणी काढून त्या भोंदूच्या संस्थेकडे वळवण्याचा प्रयत्न झाला. हा केवळ गैरव्यवहार नाही, तर हा सरळ-सरळ महाराष्ट्रातील सामान्य जनतेवरील अन्याय आहे, त्यांच्या हक्कांवरचा डाका आहे.



एकदा मोठे लोक झुकले की, त्यामागे संपूर्ण व्यवस्था रांग लावते, हे या प्रकरणाने पुन्हा सिद्ध केलं. कोणाला पद हवं, कोणाला संरक्षण हवं, कोणाला कंत्राटं हवीत, कोणाला फक्त सत्तेच्या जवळ राहायचं असतं आणि या सगळ्यांच्या इच्छांचा बाजार मांडला जातो त्या भोंदूच्या दरबारात. काही अधिकारी तर त्याच्या मालमत्तेत थेट भागीदार झाल्याचे आरोप समोर येत आहेत, हे अत्यंत भयानक आहे.

महिला आयोगासारखी संवेदनशील संस्थाही त्याला वाचवण्यासाठी पुढे येते, हे तर अधिकच धक्कादायक आहे. जी संस्था महिलांच्या सुरक्षेसाठी आहेत, ती जर अशा व्यक्तीच्या संरक्षणासाठी उभी राहात असेल, तर अत्याचारीत, पीडित महिलांनी, सामान्य नागरिकांनी न्याय कुणाकडे मागायचा?

मग खरा प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे हा भोंदू इतका शक्तिशाली होता का? की आपली व्यवस्था इतकी कमकुवत, इतकी लोभी आणि इतकी विकाऊ झाली आहे? खरं तर, अशोक खरातने काही चमत्कार केले नाहीत. त्याने फक्त व्यवस्थेची नस पकडली, कोणाला भीती दाखवायची, कोणाला लोभ दाखवायचा, कोणाला सत्तेची चव द्यायची आणि कोणाला विकत घ्यायचं. आणि, या सगळ्याच्या जोरावर त्याने उभं केलं तब्बल दीड हजार कोटींचं साम्राज्य.

दीड हजार कोटी! हा आकडा उच्चारायलाही सामान्य माणूस दहा वेळा विचार करतो. आयुष्यभर कष्ट करूनही कोटीची बचत न करणाऱ्या माणसांच्या राज्यात, एक भोंदू हजारो कोटींचा मालक बनतो. याचा अर्थ स्पष्ट आहे; व्यवस्था कुठेतरी पूर्णपणे सडली आहे. आज चौकशीतून जे काही उघड होत आहे, ते फक्त धक्कादायक नाही, तर ते लज्जास्पदही आहे.

लोक विकले गेले, संस्था वाकवल्या गेल्या, नियम मोडले गेले, आणि सर्वात मोठी गोष्ट म्हणजे; नैतिकता गप्प बसली. आणि हे सगळं घडतंय त्या महाराष्ट्रात, ज्याला आपण संतांची भूमी म्हणतो. ज्ञानेश्वर, तुकाराम यांनी या समाजाला विवेक, प्रामाणिकपणा आणि सत्याचा मार्ग दिला. पण, आज परिस्थिती अशी आहे की, एका बाजूला आपण कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान, प्रगती याबद्दल बोलतो आणि दुसऱ्या बाजूला सुशिक्षित लोक भोंदूंच्या दरबारात रांगा लावतात. ही केवळ विसंगती नाही; ही सामाजिक अधोगतीची घंटा आहे. अधिक सांगायचं तर, हा प्रकार केवळ एका भोंदूबाबाचा नाही. हा आपल्या सगळ्यांचा आरसा आहे. आपणच अशा लोकांना मोठं करतो, आपणच त्यांच्या पायावर डोकं ठेवतो, आणि मग त्यांच्यावर टीका करतो. आता तरी थांबून विचार करण्याची वेळ आली आहे की, आपण खरंच प्रगत समाज आहोत का, की फक्त आधुनिकतेचा मुखवटा घातलेला अंधश्रद्धाळू समाज? जर व्यवस्था, सत्ता आणि समाज तिघेही अशाच प्रकारे झुकत राहिले, तर उद्या प्रत्येक गल्लीमध्ये एक 'खरात' उभा राहील आणि प्रत्येक वेळी आपणच त्याच्या पायाशी जाऊन झुकत राहू. आता निवड आपली आहे; झुकायचं की उभं राहायचं. जोपर्यंत अंधश्रद्धा, लोभ आणि सत्तेची भूक यांचा हा संगनमताचा खेळ सुरू आहे, तोपर्यंत अशा भोंदूंची दुनियादारी, दुकानदारी सुरूच राहणार, हे मात्र नक्कीच! आतातरी वेळीच शहाणपण येऊ द्या, म्हणजे झालं!

लोकसंसद

## शिक्षणासाठी गड्या आपला देशच बरा!

खरे तर आपल्या देशातील लाखो विद्यार्थी दरवर्षी शिक्षणासाठी परदेशात जातात. त्याची अनेक कारणे असली तरी त्यामागे प्रामुख्याने परदेशातील शिक्षणाचा उत्तम दर्जा, जागतिक अनुभव आणि भविष्यातील करिअरच्या चांगल्या संधी याचा विचार असतो. पण अलीकडेच शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांच्या संख्येत सातत्याने घट होत असून केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अहवालानुसार गेल्या दोन वर्षांत ही संख्या ३१ टक्क्यांनी घटली आहे. या अहवालानुसार २०२३ मध्ये ९.०८ लाखांहून अधिक भारतीय विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशात गेले होते, मात्र ही संख्या २०२४ मध्ये ७.७ लाखांवर आणि त्यानंतर २०२५ मध्ये ६.२६ लाखांपर्यंत खाली आली आहे. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि युनायटेड किंगडमसारख्या देशांमधील अनिश्चित बनलेली व्हिसा धोरणे, राहणीमानाचा वाढता खर्च आणि नोकरीच्या कमी संधी अशा अशाश्वत कारणांमुळे शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचा ओघ कमी होत आहे. दुसरीकडे परदेशी विद्यापीठांची भारतात प्रस्तावित असलेली केंद्रे, देशांतर्गत उच्च शिक्षणाचे वाढते पर्याय, भारतीय विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता आणि क्षमता वाढत असल्यामुळे सुधारत असलेली जागतिक क्रमवारी यामुळेही शिक्षणासाठी परदेशात जाण्याचे आकर्षण कमी होत आहे. त्यामुळे 'शिक्षणासाठी गड्या आपला देशच बरा!' असे म्हणायची वेळ आली आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# गुलाम व्यापारातील बळींचा आंतरराष्ट्रीय स्मरण दिन

गुलामगिरी आणि अटलांटिक पारच्या गुलाम व्यापारातील बळींच्या स्मरणार्थ आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी २५ मार्च रोजी पाळला जातो. ४०० वर्षांहून अधिक काळ, मानवी इतिहासातील सर्वात काळ्या अध्यायांपैकी एक असलेल्या दुःखद अटलांटिक पारच्या गुलाम व्यापारात १५ दशलक्षाहून अधिक पुरुष, स्त्रिया आणि मुले बळी ठरली. अटलांटिकपार गुलाम व्यापाराचा एक विनाशकारी वारसा म्हणजे वंशभेद. ऐतिहासिकदृष्ट्या, आफ्रिकन लोकांना गुलाम बनवण्याचे समर्थन करण्यासाठी त्याचा वापर केला गेला. आणि आज, त्यामुळे आफ्रिकन वंशाचे लोक समाजातील सर्वात गरीब आणि सर्वात उपेक्षित घटकांमध्ये ढकलले गेले आहेत. ङ्गङ्गमानवाधिकारांचे इतिहासातील सर्वात वाईट उल्लंघनफ्फ गुलामांच्या व्यापारामुळे केले गेले असे आपल्याला इतिहासच सांगतो. गुलामांचा व्यापार हा जगातील सर्वात मोठा सक्तीचा क्रूर व्यापार होता. ४०० वर्षांहून अधिक काळ, आफ्रिकन लोकांचे मोठ्या प्रमाणावर निर्गमन जगभरात अशा प्रकारे पसरले जे यापूर्वी कधीही पाहिले गेले नव्हते किंवा मानवी इतिहासात नोंदवले गेले नव्हते. १५०१ आणि १८३० च्या दरम्यान अमेरिकन लोकसंखेत युरोपियन लोकांपेक्षा आफ्रिकन लोकांची वाढ झाली.

१६ व्या शतकात आणि १९ व्या शतका मध्ये, अंदाजे १५ ते २० दशलक्ष लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध आफ्रिकेतून मध्य, दक्षिण, उत्तर अमेरिका, तसेच युरोपमध्ये नेण्यात आले. गुलामांचा व्यापार हा युरोप, अमेरिका आणि पश्चिम आफ्रिका यांच्यातील एक फायदेशीर व्यापार होता. त्याने ब्रिटनच्या बहुतेक समृद्धीचा पाया रचला.

१८०७ मध्ये गुलामांच्या व्यापारावर बंदी घालणारा कायदा स्थापित करणारा ब्रिटन हा पहिला देश होता आणि १८१५ पर्यंत ब्रिटीशांनी नेदरलँड्स, स्पेन, फ्रान्स आणि पोर्तुगाल यांना त्याचे पालन करण्यास प्रवृत्त केले. गुलामांचा व्यापार अमेरिकेमध्ये सुमारे पाच वर्षांनंतर १८२० मध्ये बेकायदेशीर करण्यात आला आणि अखेरीस १८६५ मध्ये तो रद्द करण्यात आला. गुलामगिरी आणि अटलांटिक पार गुलाम व्यापारातील बळींच्या आंतरराष्ट्रीय स्मरण दिनामुळे, क्रूर गुलामगिरी व्यवस्थेच्या हातून ज्यांनी दुःख सोसले आणि प्राण गमावले, त्या सर्वांचा सन्मान करण्याची आणि त्यांचे स्मरण करण्याची संधी मिळते. वंशवाद आणि पूर्वग्रहाच्या धोक्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे हा देखील या दिवसाचा उद्देश आहे. पीडितांचा अधिक कायमस्वरूपी सन्मान करण्यासाठी, न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्र मुख्यालयात एक स्मारक उभारण्यात आले आहे. त्याचे अनावरण २५ मार्च २०१५ रोजी झाले. १६ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंत, सुमारे १.७ कोटी लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध आफ्रिकेतून उत्तर, मध्य आणि दक्षिण अमेरिकेत नेण्यात आले. अमेरिकेत नेत असताना आणखी लाखो लोकांचा मृत्यू झाला. हे सामूहिक निर्वासन आणि त्यातून निर्माण झालेली गुलामगिरी हे मानवाधिकारांच्या सर्वात भीषण उल्लंघनांपैकी एक मानले जाते. काही तज्ज्ञांच्या मते, याचे परिणाम आजही आफ्रिकेच्या अर्थव्यवस्थांवर जाणवतात.

४०० वर्षांहून अधिक काळ टिकलेल्या गुलामगिरीच्या व्यवस्थेखाली पुरुष, स्त्रिया आणि मुलांवर अमानुष अत्याचार झाले. या अमानुष सक्तीच्या स्थलांतराचा वारसा म्हणजे अमेरिकेतील आफ्रिकन वंशाच्या लोकांची मोठी लोकसंख्या होय ९६ टक्के कैदी दक्षिण अमेरिका आणि कॅरिबियन बेटांवर पोहोचले होते. १७ डिसेंबर २००७ रोजी, संयुक्त राष्ट्र महासभेने २५ मार्च हा मगुलामगिरी आणि अटलांटिक पार गुलाम व्यापारातील बळींच्या स्मरणार्थ आंतरराष्ट्रीय दिवसफ म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २००८ मध्ये साजरा करण्यात आला.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२५ मार्च
१) श्रीम. चित्रा रविंद्र लोंढे
वरसोली, अलिबाग
२५-३-१९६१


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५**

**(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**




## रक्तदान शिबिरात शिक्षकांचे योगदान

**चिरनेर :** भवानी फाऊंडेशन एमजीएम कामोठे हॉस्पिटलच्या सहकार्याने शनिवारी (दि.२१) आयोजित केलेल्या १३ व्या रक्तदान शिबिरात १४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यात प्रामुख्याने उरण, पनवेल तालुक्यातील प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. यात शिक्षक राजेश चोगले, चांगदेव ढगे, सुनिता ढगे, भरत शेडगे, दिलीपकुमार दहे, प्रतिभा गजबरे, धनराज पाटील, विनय कोळी, सचिन दादा चोपडे, ऋतुजा पाटील आदींनी रक्तदान केले.

## फूटपाथची दुरवस्था



**पनवेल :** पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव फडके नाट्यगृह शेजारील फूटपाथची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ठिकठिकाणी खड्डे, तुटलेली फरशी व अस्वच्छता यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

# खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका

### वाहनचालकांची तारेवरची कसरत; प्रवासीदेखील त्रस्त



**| कोलाड | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील केंद्रस्थानी असलेल्या कोलाड-रोहा मार्गांवरील आंबेवाडी नाक्यावरील द.ग. तटकरे चौकासमोर मुख्य रहदारीच्या ठिकाणी गेली चार ते पाच महिन्यांपासून रस्त्याला मोठा खड्डा पडला आहे. या खड्ड्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या खड्ड्यातून प्रवास करतांना वाहन चालकांसहित प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागत आहे. या खड्ड्यामुळे कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर हा खड्डा भरला जाईल काय? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

कोलाड-रोहा मार्गांवरील मुख्य रहदारीच्या ठिकाणी अनेक दिवसांपासून रस्ता उखडला आहे. या मार्गांवरून वाहन चालवितांना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यामुळे या ठिकाणी वाहने धिम्या गतीने चालवावी लागत असल्याने येथे वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. मुरुड ते कोलाड ताम्हाणीमार्गी पुणे या महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम अतिशय चांगल्या प्रकारे झाले असले तरी कोलाड-रोहा मार्गांवरील द. ग. तटकरे चौकासमोरील २०० मिटरच्या रस्त्याचे काम सिमेंट काँक्रिटीकरणने केले नाही. याविषयी अनेकवेळा वृत्तपत्रातून बातम्या प्रकाशित झाल्यानंतर हा खड्डा मातीने भरण्यात आला. परंतु हा खड्डा भरता भरेना! याचा नाहक त्रास वाहन चालकांसहित प्रवासी वर्गाला सहन करावा लागत आहे. यामुळे हा २०० मिटरचा रस्ता सिमेंट काँक्रेटने करण्यात यावा, अशी मागणी प्रवासी वर्गातून केली जात आहे.

दोन महिन्यांपूर्वी एक स्कुटीस्वार या खड्ड्यातून प्रवास करीत असताना स्कुटी घसरून तो खाली पडला होता. यामुळे स्कुटीस्वराच्या हाताला गंभीर जखम झाली. दैव बलवान म्हणून तो थोडक्यात बचावला. तसेच या मार्गांवर वाहनांची सतत वर्दळ सुरु असून वाहतूक कोंडी निर्माण होते. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कोलाड वाहतूक पोलीस येथे उभे असतात. परंतु, रस्त्याला पडलेला खड्डा चुकवण्याच्या नादात वाहन हे उभ्या असलेल्या पोलिसांच्या अंगावर जाऊ शकतो, हे नाकारता येत नाही.

या मार्गांवरून धाटाव एमआयडीसी, रोहा, मुरुड, अलिबाग, मुंबई, गोवा, पुणे आदी ठिकाणी ये-जा करणाऱ्या वाहनांची प्रचंड मोठ्या प्रमाणात वर्दल सुरु असते. तसेच कोलाड नाका हे बाजारपेठेचे मुख्य ठिकाण असून येथे वाडया, वस्त्या धरून एकूण ७० ते ७२ खेडेगावातील नागरिक बाजारासाठी ये-जा करीत असतात. तसेच, शाळा कॉलेजला जाणारे असंख्य विद्यार्थी याच मार्गांवरून प्रवास करीत असतात. यामुळे या ठिकाणी उखडलेल्या रस्त्यामुळे याचा नाहक त्रास वाहन चालकांसहित असंख्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. तरी संबंधितांनी याकडे त्वरित लक्ष देऊन योग्य ती उपाय योजना करावी, अशी मागणी प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

## मुंबईत ग्रंथोत्सवाचे आयोजन

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई शहराचा जिल्हा ग्रंथोत्सव २७ व २८ मार्च २०२६ रोजी दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात आयोजित करण्यात आला आहे. विविध साहित्यिक, सांस्कृतिक व वाचनविषयक कार्यक्रमांनी समृद्ध असा हा ग्रंथोत्सव होणार आहे.

२७ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता शालेय विद्यार्थ्यांच्या ग्रंथ दिंडीने ग्रंथोत्सवाची सुरुवात होईल. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ होणार आहे. उद्‌घाटनानंतर दुपारच्या सत्रात ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र पिंगे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'शब्दांचे देणे' तसेच 'लेखक तुमच्या भेटीला' या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२८ मार्च रोजी सकाळच्या सत्रात मराठीतील दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन, व्याख्यान, वाचक गौरव सोहळा आणि 'वाचनयात्रा आनंदयात्रा' या विषयावरील परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. दुपारच्या सत्रात 'कथामंजिरी' या कार्यक्रमांतर्गत नामवंत मराठी लेखकांच्या कथांचे आकर्षक सादरीकरण होणार आहे.

या दोन्ही दिवसांत सर्व वयोगटांसाठी शासकीय प्रकाशनांसह विविध खासगी प्रकाशक व विक्रेत्यांची विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध असतील. तसेच जिल्ह्यातील ग्रंथालयीन पदाधिकारी व सेवकांचा प्रातिनिधिक गौरव करण्यात येणार आहे.

मुंबईकर नागरिक, विद्यार्थी, ग्रंथप्रेमी व साहित्य रसिकांनी या ग्रंथोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुंबई शहरचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी, शशिकांत काकड यांनी केले आहे.

## स्वामींचा प्रकटदिन उत्साहात साजरा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील पळसदरी येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ यांच्या पुण्यनगरीमध्ये असलेल्या मठामध्ये प्रकटदिन साजरा करण्यात आला. यावेळी अनेक धार्मिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालखी मिरवणुकीत अनेक भक्तांची उपस्थिती होती.

श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे श्री स्वामी समर्थ प्रकटदिन अर्थात आनंदोत्सव हर्षो ल्हासात साजरा झाला. यावेळी हजारो भाविकांनी श्री स्वामी समर्थांच्या दर्शन आणि भंडारा आयोजित करण्यात आला होता.



प्रतिवर्षाप्रमाणे गुढीपाडव्याला विण्यावर श्री स्वामी समर्थ या षडा:क्षरी मंत्राच्या जपाने या कार्यक्रमाला सुरूवात झाली. श्री स्वामी समर्थ प्रकटदिनी पहाटे ब्रम्ह मुहूर्तावर श्री स्वामी समर्थांचा सामुदायिक जप त्यानंतर काकड आरती, सकाळी महा अभिषेक, दत्तयाग, दुपारी महाआरती घेण्यात आली. कलाकार विवेक भागवत निर्मित द स्वर बरसात इव्हेंट प्रस्तुत भक्तीगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात सुर नवा ध्यास नवा कार्यक्रमातील गायिका आरोही प्रभुदेसाई आणि गायक अक्षय जोशी यांनी विविध भक्तीगीते सादर केली. त्यांना तबल्यावर विवेक भागवत,संवादिनीवर स्वत: अक्षय जोशी, साईड -हिदमवर यश हजारे तसेच सारंगी प्रभुदेसाई यांनी साथ संगत केली. या कार्यक्रमाचे निवेदन अनुया गरवारे-धारप यांनी केले.

## मशिदीत समता इफ्तार कार्यक्रम

### संविधानिक मूल्यांसह सामाजिक ऐक्याचा संदेश



**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

'चला संविधानिक मूल्यांसह इफ्तार करूया' या प्रेरणादायी संकल्पनेतून एका आगळ्यावेगळ्या समता इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवराय ते भिमराय समता मार्च या उपक्रमांतर्गत महाड येथे मशिदीमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाने सामाजिक सलोखा आणि बंधुतेचा एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

संविधान गुण गौरव समितीचे नुरखाँ पठाण यांनी यावेळी संविधानाबद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले. याप्रसंगी विविध समाजघटकांनी एकत्र येत इफ्तारमध्ये सहभाग नोंदवला. केवळ उपवास सोडणे एवढ्यापुरता हा कार्यक्रम मर्यादित न राहता, समाजात समता आणि सामाजिक ऐक्याची भावना दृढ करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान भारतीय संविधान आणि इस्लाम समता व बंधुतेचा संदेश या विषयावर विशेष मार्गदर्शन करण्यात आले.

## शिर्डीत साई भक्त संमेलन

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

राम नवमीच्या पार्श्वभूमीवर नानक साई फाऊंडेशनतर्फे शिर्डी येथे बुधवारी (दि.२५) भव्य साई भक्त संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी, श्री संत कवी दासगणू महाराज साई भक्त मंडळ उमरी (गोरठे), साईं मानव सेवा ट्रस्ट, साईं धाम ट्रस्ट यांच्या सहकार्याने हे भव्य संमेलन पार पडणार आहे. हे संमेलन सर्व साई भक्तांसाठी खुले असून देशभरातील साई भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नानक साई फाऊंडेशनचे प्रमुख पंढरीनाथ बोकारे (९८२३२६००७३) यांनी केले आहे. या संमेलनास रायगडातून हजारो साईभक्त सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

त्याबरोबरच या संमेलनासाठी मुंबई, महाराष्ट्र, झारखंड, दिल्ली, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश या राज्यांतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तसेच, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडीलकर हेदेखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या साई भक्त संमेलनात भजन, पालखी मिरवणूक तसेच साई विचारांची देवाणघेवाण असे विविध भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

## निवडक



### अध्यात्मिक केंद्राचा वर्धापन दिन

**खांब :** रोहा तालुक्यातील आंबेवाडी नाका येथील श्री स्वामी समर्थ मानव विकास अध्यात्मिक केंद्राचा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळी ८:३० वाजता भूपाळी आरती, १०:३० वाजता नैवेद्य आरती त्यानंतर स्वामी याग कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर स्वामी सेवेकरांच्या अडीअडचणीतून दुःख मुक्त करण्यासाठी गुरु कन्या दीप्ती ताई यांचे प्रश्न उत्तराचे पर्व पार पडले. तर सायंकाळी ५ वाजता झालेल्या औदुंबर प्रदक्षिणात महिला भगिनींनी फार मोठा सहभाग घेऊन या उत्सवाचे आनंदात अधिकच भर घातली. तसेच सायंकाळी नैवेद्य आरती त्यानंतर राणीताई यांचे मंगलमय प्रवचन संपन्न झाले. त्यामध्येच दवेश म्हात्रे व वैभव पोटले यांनी दुसराव्य स्वामी गीताचे गायन केले. गुरुकन्या राणीताईंचे प्रवचन प्रसंगी प्रथमत: ध्यानाचा कार्यक्रम झाला. या प्रवचनासाठी स्वामी भक्तांची, स्वामी सेवेकरांची मोठीच गर्दी झाली होती. तर प्रवचन समाप्तीनंतर महाप्रसाद देण्यात आला आणि त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी आंबेवाडी येथील सर्वच सेवेकरी व सेवेकरी भगिनी यांनी विषेश मेहनत घेतली.



### बेलजाई मातेचा पालखी सोहळा

**नागोठणे :** नागोठण्याजवळील बाळसई गावाची ग्रामदेवता श्री आई बेलजाई मातेच्या मंदिराच्या १२ व्या वर्धापनदिनानिमित्त भव्य पालखी मिरवणूक सोहळा सोमवारी (दि.२३) अतिशय उत्साहमय वातावरणात पार पडला. सकाळी विविध धार्मिक विधी करण्यात आल्या. त्यानंतर दुपारी महाप्रसाद झाल्यानंतर सायंकाळी ६ वाजता श्री बेलजाई मातेच्या मंदिरातून बेलजाई मातेच्या पादुकांची फुलांनी सजवलेल्या पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. श्री बेलजाई मातेचा जयघोष तसेच बेंजोंच्या तालावर नाचण्यात गावातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी गावात सर्वत्र आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. तसेच प्रत्येकांनी घरासमोर गुढी उभारली होती. या सोहळ्याच्या निमित्ताने नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने मुंबई - ठाणे व इतरत्र असलेले चाकरमानी तसेच माहेरवाशिणी या पालखी सोहळ्यासाठी आवर्जून उपस्थित राहिले होते. हा भक्तिमय रुपातील सोहळ्याची सांगता रात्री ११ वाजता पालखी मंदिरात पोहचल्यानंतर झाली. यावेळी उपस्थितांकडून बेलजाई मातेचा जयघोष करण्यात आल्यानंतर आरती घेण्यात आली.




### पनवेलमध्ये शांतता समितीची बैठक

**पनवेल :** पनवेल येथे रामनवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी मंथन हॉल येथे संयुक्त बैठक पार पडली. यावेळी सहायक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी आयोजकांना मिरवणुकीदरम्यान वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण व स्वयंसेवक नियुक्तीबाबत सूचना दिल्या. तसेच ध्वनीप्रदूषण नियमांचे पालन करणे, प्रशासनाशी समन्वय राखणे आणि कोणत्याही प्रकारच्या प्रक्षोभक घोषणा किंवा आक्षेपार्ह बॅनर टाळण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय सायबर फसवणूक, अमली पदार्थांचे दुष्परिणाम याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात लेझर लाईटचा वापर टाळण्याचेही आवाहन करण्यात आले.

पान १ वरून

## 'अभय'ला नकार, १३४ कोटींचा भार

नगरपालिका व ग्रामपंचायतींकडून मुळ पाणी पुरवठा थकबाकी वसूल करण्यासाठी अभय योजना सुरु करण्यात आली आहे. पाणी पुरवठ्याची निव्वळ थकबाकी वसूल करून उर्वरित थकबाकी माफ करण्याचा प्रयत्न एमआयडीसीने केला आहे. मात्र, अभय योजनेकडे स्थानिक स्वराज्य संस्थाची पाठ असल्याचे औद्योगिक विकास महामंडळाकडून सांगण्यात आले. मागील ३ महिन्यांत एकाही स्थानिक स्वराज्य संस्थेने या योजनेचा लाभ घेतला नसल्याची माहिती समोर आली आहे. पाणी पुरवठा थकबाकी भरण्यासाठी दंडही भरण्याची वेळ स्थानिक स्वराज्य संस्थांवर येणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींवर करोडो रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे.

अलिबाग तालुक्यातील रेवस-तिनविरा पाणी पुरवठा योजना, रेवस पाणी पुरवठा योजना एक, रेवस पाणी पुरवठा योजना दोन (जलपाडा)सह थळ, खानाव, खंडाळे, परहूरपाडा अशा ३२ ग्रामपंचायतींकडून १३४ कोटी ८१ लाख २४ हजार ८५१ रुपयांची पाण्याची थकबाकी असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, अभय योजनेअंतर्गत थकबाकी भरल्यास फक्त २१ कोटी ३२ लाख २४ हजार ३५० रुपये भरावे लागणार आहेत. परंतु, ग्रामपंचायतींकडून पाणी पुरवठ्याची थकबाकी अभय योजनेकडून भरण्यास टाळाटाळ झाल्याने ग्रामपंचायतींवर १३४ कोटीचा आर्थिक भार पडणार आहे. हा भार पाणीपट्टीच्या स्वरुपात सर्वसामान्यांकडून ग्रामपंचायत वसूल करणार असल्याने त्याचा नाहक त्रास सर्वसामान्यांना बसणार आहे.

## रेवदंडा शाळेत अघोरी कृत्याने खळबळ

झाले आहे. घटनेची माहिती मिळताच मुख्याध्यापक उल्हास राणे यांनी रेवदंडा पोलिसांना कळवले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरू केला आहे. दरम्यान, या घटनेमागे केवळ अंधश्रद्धा नसून मोठे षडयंत्र असल्याचा संशय स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. मराठी शाळा बंद पाडून त्या जागेवर व्यावसायिक प्रकल्प उभारण्याचा डाव असल्याची चर्चा रंगली आहे. याआधीही परिसरातील एक मराठी शाळा जमीनदोस्त झाल्याने नागरिकांमध्ये संताप वाढला आहे. याच शाळेत नुकतेच पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम करण्यात आले होते. या कामाबाबत माहिती अधिकारातून कागदपत्रांची मागणी करण्यात आली असून, संभाव्य भ्रष्टाचार उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे अघोरी कृत्याचा वापर करून नागरिकांमध्ये भीती निर्माण करणे आणि प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला असावा, अशी शंका व्यक्त होत आहे.

रेवदंडा परिसरात सध्या देव-देवस्कीच्या प्रकारांमध्ये वाढ झाल्याचेही दिसून येत आहे. गल्लीबोळात लिंबू, हळद, गुलाल टाकण्याच्या घटना वारंवार घडत असून, अंधश्रद्धा निर्मूलन केवळ कागदावरच राहिल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. स्थानिक पातळीवरील राजकीय तेढ, तसेच बांधकाम आणि व्यावसायिक स्पर्धेमुळे असे प्रकार वाढत असल्याचेही बोलले जात आहे. निवडणुकांच्या काळात अशा घटनांची चर्चा होत असते, मात्र आता निवडणुका संपल्यानंतरही हे प्रकार सुरूच असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. अंधश्रद्धेच्या आडून राजकारण आणि भ्रष्टाचाराचा खेळ सुरू आहे का, याचा छडा लावण्याची जबाबदारी प्रशासनावर आली आहे.

## पेणमधील सेलिब्रेशन रिसॉर्टमध्ये कुंटणखाना

सेलिब्रेशन रिसॉर्टवर धाड टाकली. त्यावेळी त्या ठिकाणी कुंटणखाना चालविला जात असल्याचे भयानक सत्य समोर आले. अधिक तपासात त्या ठिकाणी ३ महिलांना त्यांच्या इच्छेविरूद्ध डांबून ठेवल्याचे निदर्शनास आले. तसेच, या प्रकरणात ४ पुरूष देखील पोलीसांच्या हाती लागले. जुल्फिकार जलाल उद्दिन, खगेंद्र कंम्बुमलीक, देवेंद्र पाटील व रविंद्र मलीक असे या चौघांचे नाव असून त्यांनी आर्थीक लाभासाठी तीन महिलांना डांबून ठेवले होते. व त्यांच्याकडून जबरदस्ती वेश्या व्यवसाय करून घेत होते. याप्रकरणी चौघांवर पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना दि.३० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावलीआहे. पुढील तपास पेणचे पोलीस निरिक्षक संदिप बागूल हे करीत आहेत.

## स्थानिकांना डावलून पुलाचे बांधकाम

नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या राजपूरी खाडीमध्ये १३ कोळीवाडे येत असून उदरनिर्वाहाचे साधन म्हणून या खाडीकडे पाहिले जाते.खाडीतून होत असलेल्या मासेमारीतून येथील १३ कोळीवाड्यांतील कुटूंबाला मोठा आर्थिक आधार मिळत आहे.

या खाडीवर पुल निर्माण झाल्यास येथील मच्छिमारांवर व कोळीवाड्यांतील नागरिकांवर मोठे आर्थिक संकट येण्याची भिती आहे. रोजगारावर मोठा परिणाम होण्याची चिंता श्री महालक्ष्मी मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष विजय गिदी यांनी व्यक्त केली आहे. भविष्याचे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट झाल्यास मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येणार आहे. खाडीवर जगणारे हजारो कुटूंब उध्वस्त होण्याची होतील. त्यामुळे मच्छिमारांच्या समस्यांचा विचार करून अटल सेतूप्रमाणे तेथील स्थानिक मच्छिमारांना दिलेल्या मोबदल्याप्रमाणे येथील मच्छिमारांना मोबदला देण्यात यावा. प्रत्येक कुटूंबातील सदस्यांना भविष्यामध्ये उदरनिर्वाहसाठी आर्थिक मदत मिळावी. पुलाचे बांधकाम चालु असेपर्यंत बेरोजगारांना रोजगार मिळावा, समुद्रामध्ये कामासाठी लागणाऱ्या नौका मच्छिमारांकडून घेऊन त्यावर काम करणारे कामगार सुध्दा मच्छिमारांचे घेण्यात यावे, प्रत्येक वेळी समाजातील गावांमध्ये कंपनीमार्फत सुख-सोयी पुरविण्यात याव्यात, अशा अनेक मागण्या संस्थेच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

अन्यथा श्रीमहालक्ष्मी मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी राजपूरी, हनुमान मच्छिमार व्यवसायिक सहकारी संस्था एकदरा, महेश्वरी मच्छिमार सहकारी संस्था एकदरा, जय भवानी मच्छिमार सहकारी संस्था मुरूड- जंजिरा, सागरकन्या मच्छिमार सहकारी संस्था मुरूड-जंजिरा या पाचही संस्था संघटीत होऊन एकत्रीतपणे पुलाच्या बांधकामाविरोधात आंदोलन करण्याचा इशारा श्रीमहालक्ष्मी मच्छिमार सोसायटीचे चेअरमन विजय गिदी यांनी दिला आहे. याबाबत हिंदूस्थान कंस्ट्रक्शन कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर, जिल्हा प्रशासन, मुरूड तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

## कॉलेजमधील विद्यार्थिनीवर अत्याचार

वाढवून जवळीक निर्माण करून त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. पीडितेचा विश्वास संपादन करण्यासाठी निसारने तिच्यासोबत हिंदू रितीरिवाजाप्रमाणे सात फेरे घेतल्याचे भासवून सांकेतिक विवाह केला. मात्र, तौफिक आधीपासूनच विवाहित असून त्याला चार मुले असल्याची माहिती समोर आली. तसेच, लग्नाचे खोटे आश्वासन देऊन शारीरिक संबंध प्रस्थापित केल्यानंतर, निसार याने पीडित तरुणीवर धर्मांतरासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली. त्यावेळी आपली फसवणूक झाल्याचे आणि लव्ह ट्रॅपमध्ये अडकल्याचे लक्षात येताच विद्यार्थिनीने पोलिसांत धाव घेतली.

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून, सुरुवातीला १९ मार्च रोजी ठाणे येथील मध्यवर्ती रेल्वे पोलीस स्टेशनमध्ये झिरो एफआयआर दाखल करण्यात आला होता. त्यानंतर हा गुन्हा पुढील तपासासाठी लोणावळा ग्रामीण पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तौफिक ठाणगे याला नेरळ ममदापूर येथील त्याच्या राहत्या घरातून अटक केली. निसारने यापूर्वीही इतर मुलींना अशाच प्रकारे आपल्या जाळ्यात ओढल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे नेरळ परिसरात आणि महाविद्यालयीन वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडूनच विद्यार्थिनींची अशी फसवणूक आणि शोषण होत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. तसेच, दिलकॅप कॉलेजमधील प्राचार्य व चेअरमन यांच्या आशीर्वादामुळे तर अशा घटन घडत नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

## लाडक्या बहिणींची पुन्हा धावाधाव

बहिणींच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली.

या योजनेअंतर्गत हजारो महिलांनी ई-केवायसी प्रक्रीया पुर्ण केली होती. परंतु तांत्रिक कारणास्तव, ही प्रक्रीया चुकीची व अपुर्ण असल्याचे महिला व बालविकास विभागाच्या निदर्शनास आले. चुकीची व अपूर्ण असलेली केवायसी प्रक्रीया पुन्हा सुरु करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील २२ हजार ३७५ लाडक्या बहिणींच्या कागदपत्रांची पडताळणी पुन्हा होणार आहे. ही प्रक्रीया फक्त ३१ मार्चपर्यंत असणार आहे. त्यामुळे फक्त सहा दिवसच शिल्लक राहिले आहेत. या सहा दिवसात ही प्रक्रीया पुर्ण न झाल्यास महिला या योजनेसाठी अपात्र ठरण्याची शक्यता आहे.

## ३५ प्राथमिक शाळा अनधिकृत

बुद्धिष्ट इंटरनॅशनल स्कूल सेक्टर ३, वेदिक ट्री इंटरनॅशनल स्कूल सेक्टर ३, दापोली येथील दि वृद्धिष्ट इंटरनॅशनल स्कूल ओवळेध, वावंजे येथील सनराईज इंग्लिश स्कूल, लक्ष्मण अर्जुन पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल, खारपाडा येथील साई गणेश एज्युकेशन सोसायटी नवजीवन इंटरनॅशनल स्कूल, शिरढोणपाडा येथील सेंट ग्रेगोरियस हायस्कूल, कळंबोली येथील ऑक्सफोर्ड इंग्लिश स्कूल, मार्शमेलोज इंटरनॅशनल स्कूल ओवे, काळसेकर इंग्लिश मिडीयम स्कूल पाचनंद, अर्कम इंग्लिश स्कूल तळोजा, द वेस्ट हिल इंटरनॅशनल स्कूल तळोजा, ओशियन ब्राईट कॉन्वेंट हायस्कूल तळोजा, रोहिंजण इंग्लिश स्कूल, बजाज इंटरनॅशनल स्कूल तळोजा, राईजिंग इंटरनॅशनल स्कूल कोपर उलवे, एसएमबी इंटरनॅशनल स्कूल उलवे, शाहीर बाळाराम पाटील इंग्लिश स्कूल शेडुंग, लक्ष्मी पब्लिक स्कूल सांगडे या प्राथमिक शाळा अनधिकृत असल्याची घोषणा प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांनी केली आहे. प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी ही यादी जाहीर केली आहे.

# निवडक

## वरसोली समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता



**अलिबाग :** युवा भारत युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय भारत सरकार रायगड अलिबाग सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अमित पुंडे युवा अधिकारी मेरा युवा भारत रायगड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली श्रमदानातून वरसोली समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम माझा भारत माझी जबाबदारी या थीम खाली राबविण्यात आली. यावेळी या स्वच्छता मोहिमेत जयवंत गायकवाड रायगड जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभाग, तपस्वी नंदकुमार गोंधळी राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तथा अध्यक्षा प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग, मेरा युवा भारत रायगडचे प्रतिनिधी जयेश म्हात्रे, वरसोली ग्रामपंचायतीचे कर्मचारी, स्पर्धा विश्व अकॅडमीचे विद्यार्थी प्रतिनिधी राज म्हात्रे, सुरज मोरे, प्रथमेश नाईक, श्रेयस बेलोस्कर, स्पर्धा विश्व अकॅडमीचे विद्यार्थी, स्थानिक नागरिक व युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रंधावांना 'समाज सेवा रत्न' पुरस्कार

**माणगाव :** महाराष्ट्र पोलीस न्युज - २४ याच्यातर्फे तृतीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात चारिझेन फाऊंडेशनमार्फत रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा यांचा 'समाज सेवा रत्न' पुरस्काराने पुणे येथे रविवारी (दि.२२) मार्च रोजी झाला. या कार्यक्रमात रंधावा यांचा रमेश गणगे, स्मिता बाबरे, यशोधरा गोडबोले, पूजा रंधावा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. रंधावा हे गेली अनेक वर्षांपासून चारिझेन फाऊंडेशनमार्फत विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम सातत्याने रायगड जिल्ह्यात राबवित आहेत. या फाऊंडेशनचे उद्दिष्ट म्हणजे गावा-गावात सकारात्मक बदल घडविणे, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, युवा करिअर मार्गदर्शन, आरोग्य व स्वच्छता जनजागृती शिबीरे, तसेच शैक्षणिक व पर्यावरणविषयक अभियान राबवित आहेत. त्याचाच एक भाग म्हणून रंधावा यांना 'समाज सेवा रत्न' पुरस्काराने सन्मानित केले.

## तापमान वाढल्याने माठांना मागणी

**तळा :** फेब्रुवारी महिन्यापासूनच उन्हाचे चटके बसायला सुरुवात झाली आहे. तापमानात प्रचंड वाढ झाल्याने नागरिकांची माठांना मागणी वाढली आहे. मार्च ते मे हे तीन महिने प्रचंड तापमानाचे असल्याने सामान्य नागरिक पिण्याचे पाणी ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात गावठी माठांची खरेदी करतात, मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा माठांच्या किमतीत वाढ झाली असून यावर्षी ७० ते ८० रुपये अधिक दराने माठाची विक्री केली जात आहे. गर्मीच्या दिवसांत अंगाची लाही लाही होत असताना माठातले शुद्ध व थंड पाणी तहान भागवून समाधान देते. हल्ली सर्वच ठिकाणी फिल्टर पाण्याचे थंड जार मिळत असल्याने बाजारपेठेत व्यापारी वर्ग जार घेणे पसंद करतात मात्र ग्रामीण भागात नागरिकांना माठाचे महत्व माहिती असल्याने आजही मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात गावठी माठांना मागणी आहे. तळा बाजारपेठेत गावठी माठ विक्रीसाठी दाखल झाले असून लहान माठ १५० तर मोठा माठ ३०० रुपये दराने विक्री केली जात आहे.



## पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघाची निवड



**नवीन पनवेल :** पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी लालचंद यादव यांची रविवारी (दि.२२) मार्च रोजी निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी समीर वेशवीकर, सचिवपदी मयूर तांबडे, खजिनदारपदी मिलिंद खारपाटील, सल्लागारपदी रमेश भोळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघातर्फे वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेली दोन वर्ष संघटनेचे अध्यक्ष पद मयूर तांबडे यांनी भूषवले. या काळात त्यांनी खाऊ वाटप, शाळेमध्ये वह्या वाटप, संघटनेतील पत्रकार सदस्यांना विमा वाटप, ३३ सायकलचे वाटप, २१ शिलाई मशीनचे वाटप यासारखे विविध उपक्रम राबवले. २२ मार्च रोजी झालेल्या सभेमध्ये लालचंद यादव यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी लालचंद यादव यांनी यापुढे देखील पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघाच्या वतीने विविध उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले. तसेच उपाध्यक्षपदी समीर वेशवीकर, सचिवपदी मयूर तांबडे, खजिनदारपदी मिलिंद खारपाटील, सल्लागारपदी रमेश भोळे यांची तर अशोक गोरडे, दीपक जगे, दीपक कांबळे, पंकज तांबडे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग
- **भारत पेट्रोल पंप चेंढरे** अलिबाग बायपास येथे कामासाठी मुले पाहिजेत व ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. शिक्षण B.Com ७४४७४०४४११/७४४७४०४४३८
- **शेतजमिन, आंब्याची वाडी विकणे आहे.** ठिकाण : सारळ, अलिबाग जि.रायगड, क्षेत्रफळ : ४८ गुंठे, लोकेशन वैशिष्ट्ये : मांडवा जेट्टीपासून फक्त ७ कि.मी, रेवस-करंजा पुलापासून फक्त ५ कि.मी, शांत, निसर्गरम्य परिसर, गुंतवणूक व फार्महाऊससाठी उत्तम संधी संपर्क : ८२३७१७१०६४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# कळंबमधील देना बँकेत अंधार

## •वीज बील थकीत असल्याने वीज पुरवठा खंडित•आर्थिक व्यवहार ठप्प

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील कळंब येथे आदिवासी आणि ग्रामीण भागासाठी बँक उभी राहिली. ५० हून अधिक गावे आणि वाड्या यांचा संपर्क असलेल्या कळंब येथील देना बँकेचे वीज जोडणी कापण्यात आली आहे. वीज देयक थकीत असल्याने महावितरण कंपनीकडून वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. दरम्यान, वीज पुरवठा खंडित झाल्याने येथील बँक व्यवहार सोमवारी (दि.२३) मार्चपासून बंद पडले असून बँके बाहेर ग्राहकांची गर्दी झाली आहे.





कळंब या कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग येथील गावाचे आसपास असलेल्या ५० हून अधिक गावे आणि आदिवासी वाड्यांसाठी बँक उभी राहिली आहे. तेथील देना बँकेत २० हजाराहून अधिक खातेदार असून या बँकेचा कारभार सतत चर्चेत येत असतो. काही वर्षापूर्वी या बँकेच्या इमारतीला शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती आणि तेथील लोखंडी तिजोरी वगळता अन्य सर्व त्या आगीत जळून खाक झाले होते. त्यानंतर कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असलेल्या या बँकेत गेली दोन दिवस काळाकुट्ट अंधार आहे. बँकेचे वीज जोडणी त्यांचे वीज देयक थकल्याने कापण्यात आले आहे. त्याचा परिणाम बँकेच्या आतमध्ये पूर्ण अंधार असून बँकेचे इन्व्हर्टर बॅक अप देखील कालच संपला आहे. त्यामुळे आज तर बँकेत बसण्याची देखील व्यवस्था नाही एवढा अंधार बँकेमध्ये निर्माण झाला आहे. २७ हजाराचे बील थकल्याने महावितरण कंपनीच्या कळंब सहाय्यक अभियंता कार्यालयाने येथील वीज जोडणी कापली आहे. त्यामुळे कळंब येथील बँक अंधारात गेली असून त्याचा परिणाम तेथील सर्व आर्थिक व्यवहार थांबले आहेत.

सध्या महावितरणची थकीत वीज वसुली मोहीम सुरू असून त्याद्वारे सलग दोन महिन्याचे वीज देयक थकले असल्यास वीज जोडणी तोडून टाकले जात आहे. तर काही हजारात वीज देयक थकीत असल्यास वीज जोडणी कापण्याची आणि वीज मीटर काढून नेण्याची कार्यवाही महावितरण करीत आहे. महावितरण कंपनीच्या या धडक कारवाईचा परिणाम कळंब येथील देना बँक अंधारात गेली आहे.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील सर्व खातेदार या बँकेत आहेत आणि मार्च अखेर असल्याने देणी फेडण्यासाठी आर्थिक व्यवहार केले जात असतात. असे व्यवहार करण्यासाठी ग्राहक सध्या बँकांमध्ये गर्दी करून असतात. कळंब येथील देना बँकेत आज सकाळपासून दूर दूर वरून ग्राहक येत असून वीज बंद असल्याने बँकेचे व्यवहार बंद आहेत आणि त्यामुळे ग्राहकांना कोणतेही व्यवहार करता येत नाहीत. त्यामुळे पैशाची चणचण असलेल्या ग्राहकांना हात हलवत परत जावे लागत आहे. त्याचवेळी सध्या लग्न सराई सुरू झाली असून पैशाची गरज सर्वांना असून बँकेत आर्थिक व्यवहार करण्यासाठी ग्रामीण भागांतून कळंब येथे पोहोचणारे ग्राहक यांना उन्हात रिकाम्या हाताने परत यावे लागत आहे.

> "वीज पुरवठा खंडित असल्याने आर्थिक कोणतेही व्यवहार तेथे होत नाहीत. सर्व प्रकार २३ नोव्हेंबरपासून सुरू असून महावितरणकडे थकीत असलेले २७ हजाराचे देयक बँकेने भरावे."
> -लक्ष्मण पोसाटे
> बँकेचे ग्राहक

## दुरशेत येथे राज्यस्तरीय नृत्य स्पर्धा

| चिरनेर | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील दुरशेत येथील श्री गणेश कलामंच दुरशेत यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय नृत्य स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत एकेरी तसेच सामूहिक नृत्य प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. परीक्षक म्हणून निलेश म्हात्रे यांनी काम पाहिले. निलेश गावंड, सचिन गावंड कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सामूहिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक हनुमान कला मंच उरण यांनी पटकाविला, विश्वरूप कला मंच वशेणी-उरण (द्वितीय) रोअर डान्स ग्रुप ठाणे (तृतीय) तर ओम साई डान्स ग्रुप पाली, धैर्य डान्स ग्रुप पनवेल व हर्षाली डान्स ग्रुप पेझारी यांना उत्तेजनार्थाची पारितोषिके देण्यात आली. एकेरी गटात आस्था दलवी व वेदा विजय यादव यांना प्रथम क्रमांक देण्यात आला. द्वितीय क्रमांक आर्या नारंगीकर व हर्षिता कदम यांना द्वितीय क्रमांक देण्यात आला. श्रीजा पाटील हिने तृतीय क्रमांक मिळविला. तसेच काव्या ठाकूर, रितिका शिंदे, आरोही लोळगे, दुर्वा धावरे, विहान नाईक, प्रिन्स म्हात्रे व सानवी कोठावळे यांना उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात आली.



## न्हावे गावदेवीचा पालखी सोहळा

**उरण :** चैत्र महिन्याच्या आगमनाने उरण तालुक्यात यात्रा-जत्रांचे वातावरण निर्माण झाले असून २ एप्रिल रोजी हनुमान जयंतीनंतर ग्रामदैवतांच्या यात्रांना प्रारंभ होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर न्हावे गावातील जागृत देवस्थान व नवसाला पावणारी अशी ख्याती असलेल्या गावदेवीची यात्रा व पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. दि. ३ एप्रिल रोजी गावदेवीची यात्रा भरविण्यात येणार असून दि. ४ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता पालखी सोहळ्याची मिरवणूक काढण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे या यात्रेसाठी हजारो भाविकांची उपस्थिती लाभत आहेत.

## प्रज्ञा शोध परीक्षेत 'माही' जिल्ह्यात प्रथम

| खांब | प्रतिनिधी |

राजिप प्राथमिक शाळा सोनगाव येथील विद्यार्थीनी माही गणेश तेलंगे हिने प्रज्ञा शोध परीक्षेत यश संपादित केले आहे. गुरुकुल एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षा २०२६ ही परीक्षा द. ग तटकरे माध्य.विद्यालय कोलाड, ता. रोहा येथे झाली होती. या परीक्षेत सोनगाव शाळेतील इ. ४ थीमध्ये शिक्षण घेत असलेली माहीने भाषा व गणित १५० पैकी १२८ गुण व इंग्रजी व बुद्धिमत्ता १५० पैकी ९८ असे ३०० पैकी २२६ एकूण ७५:३३ टक्के गुण मिळवून जिल्ह्यात प्रथम क्रमांक व महाराष्ट्र राज्यात ३३ क्रमांकावर उत्तुंग भरारी घेत उज्वल यश प्राप्त केले आहे.



माहीच्या यशामध्ये तिची आई-वडील, राजिप शाळा सोनगाव शाळेतील शिक्षक ब्रिजेश भादेकर, संतोष धोत्रे यांचा मोलाचा वाटा आहे. तिच्या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

## ज्येष्ठाला दहा लाखांचा गंडा

**नवी पनवेल :** सायबर चोरट्याने ६१ वर्षीय व्यक्तीची तब्बल १० लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. बनावट कॉल आणि मोबाईल पच्या माध्यमातून ही फसवणूक करण्यात आली आहे. एअर इंडियाचे 'महाराजा क्लब कार्ड' देण्याच्या बहाण्याने एका सायबर चोरट्याने नवी मुंबईतील ६१ वर्षीय ट्रान्स्पोर्ट कन्सल्टंटकडून दहा लाख ३७ हजार रुपये लुबाडल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाशी येथील रहिवासी श्रीधर रायकर यांना एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला. संबंधित व्यक्तीने स्वतःचे नाव वरुण कुमार सांगत आपण एअर इंडियातून बोलत असल्याचे भासवले. त्यानंतर एअर इंडिया महाराजा क्लब कार्ड बाबत माहिती देण्याच्या बहाण्याने त्याने रायकरांना मोबाईल ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. रायकरांनी त्याच्यावर विश्वास ठेवून संबंधित ॲप डाऊनलोड केले. त्यानंतर सायबर चोरट्याने रायकरांच्या बँक खात्याची तसेच क्रेडिट कार्डची माहिती मिळवली. पुढे त्यांच्या खात्यातून टप्प्याटप्प्याने एकूण १० लाख ३७ हजार रुपये काढून घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच रायकरांनी एनसीआरपी पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदवली. त्यानंतर रविवारी (दि.२२) त्यांनी वाशी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली.

## एकवीरा देवीच्या जत्रेचे आयोजन

**उरण :** कार्ला गडावरील आई एकवीरा देवीचा जत्रा उत्सव सोहळा बुधवारी (दि.२५) रोजी पार पडणार आहे. भाविकांचे ग्रामदैवत असलेल्या आई एकवीरा देवीचे प्राचीन मंदिर उरण तालुक्यातील मोरा बंदर येथे असून या मंदिरात तसेच कळंबुसरे चिरनेर येथील इंद्रायणी डोंगर, कोप्रोली, पिरकोण, चिर्ले, वेश्वी, म्हातवली गावातील एकवीरा देवीच्या मंदिरात जत्रा उत्सवाचे आयोजन मंदिर व्यवस्थापनाने केले आहे. मोरा बंदर येथे असून या मंदिरात गेली अनेक वर्षे जत्रा उत्सवाचे आयोजन करण्यात येते. कळंबुसरे-चिरनेर येथील इंद्रायणी डोंगर, कोप्रोली, पिरकोण, चिर्ले, वेश्वी गावात मंदिरात ही जत्रा उत्सवाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे.

## वन विभागाचे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

खोपोली गारमाळ परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर खालापूर तालुका वन विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच वन विभागाच्या वतीने परिसरात बिबट्याचा वावर आहे, काळजी घ्या अशा आशयाचे फलक लावण्यात आले आहे.

खालापूर तालुका वनाधिकारी राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल भगवान दळवी, हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर तसेच वनकर्मचारी घुटे, नागरगोजे, काटकर आणि प्राणीमित्रांच्या सहकार्याने गारमाळ परिसरातील जंगल व दरी भागात सर्वेक्षण करण्यात आले. या पाहणी दरम्यान वन्य प्राण्यांसाठी असलेले नैसर्गिक पाणवठे शोधून त्यातील गाळ काढून स्वच्छ करण्यात आले.



सदर सर्वेक्षणात तीन ठिकाणी बिबट्याची विष्ठा आढळून आली, तर काही ठिकाणी साळींदर, व इतर या प्राण्यांच्या पायांचे ठसेही दिसून आले. त्यामुळे या परिसरात बिबट्या आणि अन्य प्राण्यांचा सक्रिय वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे.दरम्यान, या पार्श्वभूमीवर अहिल फेन्स ॲण्ड गॅबियनचे डायरेक्टर अशपाक लोगडे, हेल्प फाऊंडेशनचे अमोल कदम, अमोल ठकेकर, दिनेश ओसवाल, निलेश कुदळे, महेश भोसले, भक्ती साठेलकर, शंतनु खरे इत्यादी सदस्यांनी तालुका वन विभागातील कर्मचारी यांचे सोबत गस्त घालण्याची तयारी दर्शवली आहे.

## आक्रोश मोर्चाच्या नियोजनाची तयारी



| उरण | प्रतिनिधी|

रायगड जिल्हा व्यापक कार्यकर्ता बैठक सोमवारी (दि.२३) मार्च रोजी तळवली (कोलाड) श्री ज्ञानेश्वर मंदिर येथे संपन्न झाली. या बैठकीत १६ एप्रिल रोजी मुंबई येथे होणाऱ्या आक्रोश मोर्चा बाबत सविस्तर चर्चा करून, कामगार मोठ्या संख्येने या मोर्चामध्ये सहभागी होतील या दृष्टीने गावस्तरावर बैठका घेऊन संख्या निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी असंघटित-संघटीत क्षेत्रातील कामगारांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत शासनाचे कामगार विरोधी धोरण व कामगारांवर होणारा अन्याय याबाबत जनजागृती करण्याचा निर्णय झाला.

या बैठकीस भारतीय मजदूर संघ प्रदेश सचिव हरी चव्हाण, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश पाटील, जिल्हा सचिव अशोक निकम यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच बांधकाम जिल्हा अध्यक्ष विकास सुतार, सचिव संतोष सुतार यांनी मोर्चा नियोजन बाबत विचार मांडले. यावेळी डि. पी.सोनवणे, नामदेव सुतार, शैलेश पिंपळकर, अंकित सुतार व बांधकाम गाव प्रतिनिधी, औद्योगिक पदाधिकारी, पोर्ट पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम

**पनवेल :** सुरक्षित आणि जबाबदार प्रवासाची जाणीव वाढवण्यासाठी होंडा मोटरसायकल ॲण्ड स्कूटर इंडिया यांनी महाराष्ट्रातील चिपळूण येथे संरचित रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम आयोजित केली. या उपक्रमात मेरी माथा स्कूल आणि सती इंग्लिश मीडियम स्कूलमधील २४०० हून अधिक सहभागी एकत्र आले आणि दैनंदिन वाहतूक जागरूकतेला एक रंजक व सहभागी शिक्षणाचा अनुभव मिळाला. या मोहिमेत रस्ता सुरक्षा विषयावरील जनजागृती सत्रे, खेळ, क्विझ आणि परिस्थितीआधारित चर्चा यांचा समावेश होता. यामुळे सहभागींना सुरक्षिततेची तत्त्वे प्रत्यक्ष आयुष्यातील परिस्थितींशी जोडून समजून घेण्यास मदत झाली.

## कळंबोलीतील क्रीडांगणाच्या विकासाला गती

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

पालिका हद्दीतील कळंबोली येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणाचे अत्याधुनिक क्रिकेट मैदानात रूपांतर करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. यासाठी समाजसेवक प्रशांत रणवरे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश येताना दिसत आहे. या संदर्भात रणवरे यांनी संबंधित विभाग तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करत अर्ज सादर केला होता. त्यांच्या या प्रयत्नांची दखल घेत प्रशासनाने सदर प्रस्तावाची प्रक्रिया सुरू केली आहे.महापालिकेकडून मिळालेल्या माहितीनुसार, क्रीडांगणाच्या विकासासंदर्भातील प्रस्ताव सध्या प्रशासकीय टप्प्यात असून आवश्यक मंजुरीसाठी हालचाली सुरू आहेत. महसूल व वन विभाग तसेच कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाशीही पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

दरम्यान, हे क्रीडांगण अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज झाल्यास कळंबोली परिसरातील खेळाडूंना मोठा दिलासा मिळणार असून स्थानिक स्तरावर क्रीडा विकासाला चालना मिळणार आहे.

### बहावा, निवडुंग, गुलमोहर वृक्षांना बहर | निसर्गप्रेमी, पर्यटकांचा आकर्षणाचा विषय

# चैत्राच्या आगमनाने रानफुले बहरली

| नेरळ | प्रतिनिधी |

मार्च महिन्यात उन्हाचा पारा चढत असताना रानावनात मात्र उन्हाळी रानफुलांचा बहर आला आहे. चैत्र महिना सुरू झाल्यानंतर रानावनात झाडांना पालवी फुटली असून या पालवीतच बहावा, निवडुंग, गुलमोहर आदी वृक्षांना मोठ्या प्रमाणात फुलांचा बहर आला आहे. रानावनात झाडांना पालवी बरोबरच आलेला हा बहर निसर्गप्रेमी, पर्यटकांच्या आकर्षणाचा विषय होत असून निसर्गातील उन्हाळ्याच्या काहिलीत बहरणारी रानफुले निसर्गाची शोभा वाढवित आहेत.

उन्हाळा हा काहीसा उदासवाना ऋतू असतो. झाडांची पानगळ, उन्हाची वाढणारी काहिली व भकास वाटणारे रान असे काहीसे चित्र सर्वत्र दिसते. मात्र याच ऋतूत रानातील अनेक फळ झाडे, फुल झाडे फुलून येतात यामुळें उन्हाळ्याच्या दिवसात रानाची शोभा वाढत असून रानावनात झाडांना उन्हाळी रान फुलांचा, फळांचा बहर आलेला दिसत आहे.



कोकणातील सह्याद्री पर्वताची कडे कपारीत, रस्त्यांच्या दुतर्फा, शेत शिवारात असंख्य प्रकारच्या फळ, फुल झाडांना पालवी बरोबरच फुलांचे गुच्छ आले आहेत. एरवी उन्हाळा रुक्ष, उदास वाटतो मात्र रानावनात फुलणाऱ्या उन्हाळी रान फुलांनी उन्हाळ्यातही निसर्ग आपली शोभा कायम ठेऊन सुंदरता कायम राखत आहे. चैत्र महिन्यातील हे निसर्ग सौंदर्य पाहून निसर्गप्रेमी, पर्यटक समाधान व्यक्त करीत आहेत.

> "उन्हाळा वाढत असताना रानावनात असंख्य प्रकारच्या झाडा, वेलीना फुलांचा बहर आला आहे. हा बहर रानावणाची शोभा वाढत आहे. रानात बहरलेली ही फुले पाहणे अतिशय आनंदाचे आहे. ही फुले ऐन उन्हाळ्यात फुलतात. या नंतर काही दिवसांनी पावसाळा सुरू होईल.पावसाळा जवळ आल्याचे उन्हाळी रान फुले संकेत देतात."
> -विलास देगावकर
> फुल निरीक्षक, माणगाव.

# उरणमध्ये युद्धाचे पडसाद; हॉटेल व्यवसाय संकटात

**| उरण | प्रतिनिधी |**

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धपरिस्थितीचे पडसाद आता उरणमध्ये उमटू लागले असून, त्याचा थेट परिणाम हॉटेल व्यवसायावर होत आहे. जीवनावश्यक अन्नपदार्थांच्या किमतीत सातत्याने वाढ, पुरवठा साखळीतील अडथळे आणि गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यावसायिकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे.

गेल्या काही दिवसांत गहू, तांदूळ, खाद्यतेल, डाळी तसेच भाजीपाल्याच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. आयात-निर्यात प्रक्रियेतील अडथळे, वाढलेला वाहतूक खर्च आणि उपलब्धतेतील अनिश्चितता यामुळे बाजारातील पुरवठा मर्यादित झाला आहे. परिणामी, हॉटेल चालकांना तयार पदार्थांच्या दरात वाढ करणे भाग पडत आहे.

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या टंचाईमुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. काही ठिकाणी नाश्ता व स्नॅक्सच्या दरात तात्पुरती वाढ करण्यात आली असून, ग्राहकांना याबाबत सूचना देण्यात येत आहेत. अनेक हॉटेल्सनी पूर्ण मेन्यूऐवजी मर्यादित पदार्थ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. दरवाढ आणि मर्यादित मेन्यूमुळे ग्राहकांच्या खर्चावर अतिरिक्त ताण पडत असून, त्यांच्या गैरसोयीची जाणीव व्यावसायिकांना आहे. परिस्थिती सामान्य होताच दर पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे व्यावसायिकांनी सांगितले. दरम्यान, वाढलेला खर्च आणि घटलेली ग्राहकसंख्या यामुळे हॉटेल व्यवसायाच्या नफ्यात घट होत आहे. काही लहान हॉटेल्सनी तात्पुरते शटर खाली ओढले असून, काहींनी चुलीवर स्वयंपाक करण्याचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र या पद्धतीमुळे खर्च वाढत असून सेवा देण्यात अडचणी येत आहेत. हॉटेल व्यवसाय अडचणीत आल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खाणावळी, खाद्य स्टॉल व्यवसायावरही याचे पडसाद उमटत आहेत.

हॉटेल व्यावसायिकांनी प्रशासनाकडे व्यावसायिक गॅस सिलिंडरसाठी स्वतंत्र कोटा उपलब्ध करून देण्याची मागणी केली असून, ही समस्या लवकर सोडवली नाही तर याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांजकडून

### शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/कोशिंबळे तर्फे निजामपूर/एसआर- ९५/२०१२ दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/ भूसं/ कात-२/एसआर - ९५/२०१२ दिनांक ०४/०८/२०१६ अन्वये मौजे - कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता.माणगांव, जिल्हा - रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (१) ची अधिसूचना स्थानिक वर्तमानपत्रात सन २०१६ रोजी प्रसिद्ध झाली आहे;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०११/(प्र.क्र.३०७)/उद्योग-१४ दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ अन्वये मौजे - कोशिंबळे तर्फे निजामपूर ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील सर्व्हे नंबर हे खाजगी मधून सरकारी क्षेत्रात समाविष्ट झाल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार ब पृष्ठ क्रमांक ०१ ते ०२ मध्ये दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी शुद्धीपत्रकान्वये जाहिर केले आहे;

त्याअर्थी, स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२ (१) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**

**पाणसई औद्योगिक क्षेत्र**

**जिल्हा-रायगड, ता. माणगांव, गांव - कोशिंबळे तर्फे निजामपूर**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| ४४ | १ | ०.०४३ | प्रस्तूत स. नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे. | | |
| ५१ | ५ | ०.१८० | प्रस्तूत स. नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे. | | |

ठिकाण - माणगांव,
दिनांक १८/०३/२०२६

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
उप विभागीय अधिकारी माणगांव,
उपविभाग माणगांव

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/४३१/४११/२०२६**

## उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांजकडून

### शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/कोशिंबळे तर्फे निजामपूर/एसआर- ९५/२०१२ दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/एसआर - ९७/२०१२ दिनांक ०७/०७/२०१५ अन्वये मौजे - कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता.माणगांव, जिल्हा - रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (२) ची अधिसूचना स्थानिक वर्तमानपत्रात सन २०१५ रोजी प्रसिद्ध झाली आहे;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०११/(प्र.क्र.३०७)/उद्योग-१४ दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ अन्वये मौजे- कोशिंबळे तर्फे निजामपूर ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील सर्व्हे नंबर हे खाजगी मधून सरकारी क्षेत्रात समाविष्ट झाल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार ब पृष्ठ क्रमांक ०१ ते ०२ मध्ये दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी शुद्धीपत्रकान्वये जाहिर केले आहे;

त्याअर्थी, स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२ (२) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**

**पाणसई औद्योगिक क्षेत्र**

**जिल्हा-रायगड, ता. माणगांव, गांव - कोशिंबळे तर्फे निजामपूर**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| ४४ | १ | ०.०४३ | प्रस्तूत स. नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे. | | |
| ५१ | ५ | ०.१८० | प्रस्तूत स. नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे. | | |

ठिकाण - माणगांव,
दिनांक १८/०३/२०२६

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
उप विभागीय अधिकारी माणगांव,
उपविभाग माणगांव

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/४२९/४०५/२०२६**

## उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव, जि.रायगड यांजकडून

क्रमांक - उविअमा - भूसं/कात -२/ एस. आर. ५४६/२०११, ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा -तीन) चे कलम १, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक ०४ मार्च, २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र, भाग चार ब, पृष्ठ क्र. ०१ वर प्रसिद्ध करण्यात आलेली उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२६/(प्र.क्र.३५)/उ -१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास मार्च २०२६ या महिन्याच्या चौथ्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी या उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा ''उक्त महामंडळ'' असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्ट्यर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्यशासनास प्रदान करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी/ १८९२ (१७४४१), उद्योग १४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोटकलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोटकलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करुन याद्वारे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधीत भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येवू नये? या संबंधी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सहीं करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

ठिकाण - माणगांव
दिनांक - १८/०३/२०२६.

सही/-
**(डॉ. संदीपान सानप )**
उपविभागीय अधिकारी.
माणगांव उपविभाग, माणगांव

**अनुसूची**

**जिल्हा - रायगड, तालुका - रोहा, गांव - जामगांव**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ५१० | ० | ४.०१०० |
| २ | २३४ | पैकी | ०.१७६८ |
| ३ | २३७ | पैकी | ०.३७२४ |
| ४ | २३८ | ० | ०.१००० |
| ५ | २३९ | पैकी | ०.४९२९ |
| | | एकुण | ५.१५३१ |

ठिकाण -माणगांव,
दिनांक - १८/०३/२०२६.

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
उपविभागीय अधिकारी,
माणगांव उपविभाग, माणगांव

**क्र./जिमाका/रायगड/४३५/४२३/२०२६**

## उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव, जि.रायगड यांजकडून

क्रमांक - उविअमा-भूसं/कात -२/ एस. आर. ५४७/२०११, ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा-तीन) चे कलम १, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक ०४ मार्च, २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र, भाग चार ब, पृष्ठ क्र. ०३ वर प्रसिद्ध करण्यात आलेली उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२६/(प्र.क्र.३५)/उ -१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास मार्च २०२६ या महिन्याच्या चौथ्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी या उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा ''उक्त महामंडळ'' असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्ट्यर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्यशासनास प्रदान करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी/ १८९२ (१७४४१), उद्योग १४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोटकलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोटकलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करुन याद्वारे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधीत भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येवू नये? या संबंधी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

ठिकाण - माणगांव
दिनांक - १८/०३/२०२६.

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
उपविभागीय अधिकारी.
माणगांव उपविभाग, माणगांव

**अनुसूची**

**जिल्हा - रायगड, तालुका - रोहा, गांव - पाथरशेत**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | ९८ | ० | ०.२१३० |
| २. | ९९ | ० | ०.०१५० |
| ३. | ५६६ | ० | ०.२८१० |
| ४. | ५९४ | ० | ०.०४१० |
| ५. | ५९५ | ० | ०.०६०० |
| ६. | ५९९ | ० | ०.०३८० |
| ७. | ६०० | अ | ०.२३७० |
| | | एकुण | ०.८८५० |

ठिकाण -माणगांव,
दिनांक - १८/०३/२०२६.

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
उपविभागीय अधिकारी,
माणगांव उपविभाग, माणगांव


**क्र./जिमाका/रायगड/४३४/४२०/२०२६**

# आयपीएलसाठी बीसीसीआयच्या गाईडलाईन

## ● सामन्याच्या दिवशी सरावावर बंदी ●जर्सी क्रमांक बदलल्यास कळवावे लागणार ● ड्रेसिंग रूममध्ये कर्मचाऱ्यांना प्रवेश

। मुंबई । प्रतिनिधी ।

**आयपीएल २०२६ साठी बीसीसीआयने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यानुसार, सामन्याच्या दिवशी कोणतीही टीम सराव करू शकणार नाही. तसेच, खेळाडूंसाठी सामन्याच्या दिवशी फिटनेस चाचणी होणार नाही. याशिवाय, जर्सी नंबर बदलण्यापूर्वी २४ तास आधी माहिती द्यावी लागेल आणि ड्रेसिंग रूममध्ये फक्त कर्मचाऱ्यांनाच प्रवेश मिळेल. आयपीएलची सुरुवात २८ मार्चपासून होईल. पहिला सामना गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला जाईल. बीसीसीआयने ११ मार्च रोजी आयपीएल २०२६ च्या पहिल्या टप्प्याचे वेळापत्रक जारी केले आहे.**









मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये संघांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. येथे दोन्ही संघांना सरावासाठी वेगवेगळे विकेट मिळतील आणि कोणताही संघ प्रतिस्पर्धी संघाच्या विकेटचा वापर करू शकणार नाही. प्रत्येक संघाला सराव क्षेत्रात दोन नेट आणि मुख्य स्क्वेअरवर एक साइड विकेट दिला जाईल. मुंबईत जर दोन्ही संघ एकाच वेळी सराव करत असतील, तर त्यांना प्रत्येकी दोन विकेट दिले जातील. ओपन नेटला परवानगी नसेल, जेणेकरून सराव व्यवस्थित राहील. त्याचबरोबर, जर कोणताही संघ आपला सराव लवकर संपवेल, तर दुसरा संघ त्याच्या विकेटचा वापर करू शकणार नाही. सर्वात महत्त्वाचा नियम हा आहे की सामन्याच्या दिवशी कोणत्याही प्रकारच्या सरावाला पूर्णपणे बंदी असेल.

सामन्याच्या दिवशी मुख्य स्क्वेअरवर कोणत्याही प्रकारची फिटनेस चाचणी केली जाणार नाही. खेळाडूंना सरावासाठी टीम बसनेच यावे लागेल, तथापि, गरज पडल्यास त्यांना दोन बॅचमध्ये आणले जाऊ शकते. खेळाडूंचे कुटुंब आणि मित्र वेगळ्या वाहनाने येतील आणि केवळ हॉस्पिटॅलिटी एरियातूनच सराव पाहू शकतील. ड्रेसिंग रूम आणि मैदानावर केवळ अधिकृत कर्मचाऱ्यांनाच प्रवेशाची परवानगी असेल, जेणेकरून सुरक्षा आणि शिस्त राखली जाईल. कर्मचाऱ्यांनी एक्रेडिटेशन कार्ड सोबत ठेवावे लागेल.

सामन्याच्या दिवशी सर्व अधिकृत कर्मचाऱ्यांसाठी मान्यता कार्ड सोबत ठेवणे अनिवार्य असेल, अन्यथा दंड आकारला जाईल. खेळाडूंना बोर्डजवळ बसणे किंवा चेंडू मारणे टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. प्रक्षेपणाच्या नियमांनुसार, सुरुवातीच्या षटकांमध्ये ऑरेंज आणि पर्पल कॅप घालणे आवश्यक असेल. याव्यतिरिक्त, सामन्यानंतरच्या सादरीकरणादरम्यान स्लीव्हलेस जर्सी किंवा फ्लॉपी घालण्याची परवानगी नसेल. सामन्याच्या दिवशी केवळ १२ सपोर्ट स्टाफला संघासोबत राहण्याची परवानगी मिळेल.

संघांना त्यांच्या खेळाडूंच्या जर्सी क्रमांकामध्ये कोणत्याही बदलाची माहिती किमान २४ तास आधी द्यावी लागेल. या सर्व नवीन नियमांचा उद्देश सामन्यादरम्यान शिस्त राखणे आणि सर्व संघांसाठी समान परिस्थिती सुनिश्चित करणे हा आहे.

---

## निवडक

### आत्माराम मोरे स्मृती क्रिकेट स्पर्धेत लीलावती, जेजेचा विजयी प्रारंभ

**मुंबई :** आत्माराम मोरे प्रतिष्ठान आयोजित लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत ज्येष्ठ पत्रकार स्व. आत्माराम मोरे स्मृती चषक आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेत सामनावीर संदीप कणसे (३७ धावा) व संतोष पंधारे (३४ धावा) यांच्या दमदार फलंदाजीमुळे लीलावती हॉस्पिटलने बलाढ्य केडीए हॉस्पिटल-नवी मुंबई संघाचा ५ विकेटने पराभव केला आणि सनसनाटी विजयासह सलामीची लढत जिंकली. शतकवीर नितीन कांबळेने केडीए हॉस्पिटलचा पराभव टाळण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. दुसऱ्या सामन्यात जे.जे. हॉस्पिटलने बॉम्बे हॉस्पिटल संघावर ८ विकेटने धडाकेबाज विजय मिळविला. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने सुरू झालेल्या स्पर्धेत लीलावती हॉस्पिटलने नाणेफेक जिंकून केडीए हॉस्पिटलला प्रथम फलंदाजी दिली. लीलावती हॉस्पिटलचा मध्यमगती गोलंदाज पराग जाधवच्या (२० धावांत ३ बळी) अचूक गोलंदाजीमुळे केडीए हॉस्पिटलची दुसऱ्या षटकात ३ बाद १५ धावा अशी बिकट अवस्था झाली. परंतु नितीन कांबळेच्या (५० चेंडूत १०३ धावा) झंझावाती शतकी फलंदाजीमुळे केडीए हॉस्पिटल-नवी मुंबई संघाने मर्यादित २० षटकात ६ बाद १५९ धावसंख्या उभारली. संदीप कणसे (२५ चेंडूत ३७ धावा) व संतोष पंधारे (२५ चेंडूत ३४ धावा) यांच्या दमदार फलंदाजीमुळे लीलावती हॉस्पिटलने विजयी लक्ष्य १८.२ षटकात ५ बाद १६३ धावा फटकावून साध्य केले. दुसऱ्या सामन्यात फिरकी गोलंदाज प्रवीण वाघेलाच्या हॅटट्रीकमुळे जे.जे. हॉस्पिटलने बॉम्बे हॉस्पिटलचा डाव १५.४ षटकात १०७ धावांमध्ये गुंडाळला. मयुरेश पाटीलने नाबाद ४६ धावा केल्या. शैलेश वाघेलाच्या दमदार अर्धशतकामुळे जे.जे. हॉस्पिटलने दहाव्या षटकाला २ बाद १०८ धावा फटकावून बॉम्बे हॉस्पिटल विरुध्द मोठा विजय नोंदविला.

### सिनरने मोडला जोकोविचचा विक्रम

**मुंबई :** इटलीचा टेनिसपटू जैनिक सिनरने एटीपी मास्टर्स १००० स्तरावर सलग सर्वाधिक सेट जिंकण्याच्या बाबतीत नोव्हाक जोकोविचचा विक्रम मोडला आहे.सिनरने मियामी ओपनच्या तिसऱ्या फेरीत कोरेंटिन मूटेला ६-१, ६-४ असे हरवले. या विजयासह सिनरने सलग जिंकलेल्या सेटची संख्या २६ झाली आहे, तर जोकोविचच्या नावावर २४ सेटचा विक्रम होता. जोकोविचने ही कामगिरी २०१६ मध्ये इंडियन वेल्स आणि मियामी दरम्यान केली होती. सिनरचा हा शानदार प्रवास गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये पॅरिस मास्टर्सपासून सुरू झाला होता. तिथे त्याने एकही सेट न गमावता विजेतेपद पटकावले होते. म्यूटेटविरुद्धच्या विजयासह सिनरने एटीपी मास्टर्स १००० स्तरावर सलग १३ सामने जिंकण्याचा विक्रमही केला आहे. सामन्यानंतर सिनरने सांगितले, मी खूप आनंदी आहे. हा खेळ अनपेक्षित आहे, म्हणून आम्ही शक्य तितके लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करतो. आता पुढील फेरीत काय होते ते पाहूया.चौथ्या फेरीत जॅनिक सिनरचा सामना अमेरिकेच्या ॲलेक्स मिचेलसनशी होईल. मिचेलसनने आपल्या तिसऱ्या फेरीच्या सामन्यात अलेजांद्रो ताबिलोला ३-६, ६-३, ६-४ ने हरवून पुढील फेरीत प्रवेश केला आहे.



### जाखमाता संघ परहूरपाडाने मारली बाजी

**सोगांव :** मुनवली येथे घाडी बंधू पुरस्कृत क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत जाखमाता संघ परहूरपाडाने बाजी मारत प्रथम क्रमांक ३० हजार रुपये व आकर्षक चषक पटकावला. या स्पर्धेत अंतिम सामना जाखमाता संघ परहूरपाडा व श्री गणेश संघ परहूरपाडा यांच्या मध्ये होऊन अटीतटीच्या लढतीत जाखमाता संघाने बाजी मारत प्रथम क्रमांक ३० हजार रुपये व आकर्षक चषक पटकावला तर श्री गणेश संघ परहूरपाडा संघाने द्वितीय क्रमांक २० हजार रुपये व आकर्षक चषक पटकावला, तसेच श्री दत्तप्रसाद संघ बहिरोळे यांनी तृतीय क्रमांक १० हजार रुपये व आकर्षक चषक पटकावला. स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाजचा मान श्री दत्तप्रसाद संघ बहिरोळे संघाचा वितेश कवळे याने पटकावला आणी उत्कृष्ट गोलंदाजचा मान म्हणून श्री गणेश परहूरपाडा संघातील साजन नाईक व नितेश नाईक यांनी पटकाविले, त्यांना पुरस्कार विभागून देण्यात आले. तसेच उत्कृष्ट मालिकावीर म्हणून जाखमाता संघ परहूरपाडा संघाचा राज गुंजाळ याने पटकाविले. प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट सामनावीर ठरणाऱ्या खेळाडूला मुनवली येथील अल्पेश मल्हार व अतिश मल्हार यांच्या तर्फे आकर्षक असे टी-शर्ट देण्यात आले.

---

## स्वराजने धरमतर ते गेट वे अंतर केले पार



**उरण :** जिद्द, चिकाटी आणि अंगात असलेल्या उपजत जलतरण कौशल्याच्या जोरावर उरणच्या स्वराज सोनाली संतोष पाटील या तरुण जलतरणपटूने अरबी समुद्रात एक नवा इतिहास रचला आहे.

स्वराजने मध्यरात्री बरोबर २:०० वाजता धरमतर जेटीवरून समुद्रात उडी मारून आपल्या या आव्हानात्मक मोहिमेला सुरुवात केली. अथांग समुद्राच्या गडद अंधारात आणि लाटांशी झुंज देत स्वराजने धरमतर ते गेटवे ऑफ इंडिया हे तब्बल ३६ किलोमीटरचे अंतर केवळ ९ तास ४९ मिनिटांत यशस्वीपणे पार केले.

स्वराजसाठी धरमतर ते गेट वे ही मोहीम अचानक मिळालेले यश नाही, तर त्यामागे त्याची टप्प्याटप्प्याने केलेली तयारी आहे. याआधी त्याने मोरा ते गेटवे ऑफ इंडिया' हे अंतर यशस्वीपणे पोहून पार केले होते. त्यानंतर त्याने कासा खडक ते खांदेरी किल्ला या ऐतिहासिक जलमार्गावरही आपली मोहोर उमटवली होती. या लहान पण आव्हानात्मक मोहिमांमधील यशामुळेच त्याला ३६ कि.मी.च्या मोहिमेसाठी आत्मविश्वास मिळाला. धरमतर ते गेट वे हा समुद्री मार्ग जलतरणपटूंसाठी अत्यंत कठीण मानला जातो. मध्यरात्री २ वाजता सुरू झालेल्या या मोहिमेत सुरुवातीचे काही तास स्वराजला पूर्णतः अंधारात पोहावे लागले. वाटेत येणारे भरती-ओहोटीचे प्रवाह, जेलीफिशचा धोका आणि मोठ्या जहाजांची वर्दळ या सर्वांवर मात करत स्वराजने सातत्य राखले.

जसा स्वराज गेटवे ऑफ इंडियाच्या पायऱ्यांजवळ पोहोचला, तसा तिथे उपस्थित असलेल्या कुटुंबियांनी जल्लोष केला. आईने २५ वर्षांपूर्वी जे स्वप्न पाहिले होते, ते आज मी पूर्ण करू शकलो याचा मला सार्थ अभिमान आहे, अशा भावना स्वराजने विजयानंतर व्यक्त केल्या. स्वराजच्या या कामगिरीमुळे आगामी काळात जागतिक स्तरावरील इंग्लिश चॅनेल सारख्या कठीण स्पर्धांसाठी त्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

---

## जेएनपीएत रंगणार भारतीय बंदरांची कॅरम स्पर्धा

- **देशभरातील १२ बंदरातील ९५ स्पर्धक सहभागी**
- **महिलांसाठी पहिल्यांदाच प्रतियोगिता**

। चिरनेर । प्रतिनिधी ।

अखिल भारतीय बंदरांची ४४ वी कॅरम स्पर्धा जेएनपीएच्या बहुउद्देशीय सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.या कॅरम स्पर्धेत देशभरातील १२ बंदरातुन ९५ स्पर्धक सहभागी झाले आहेत. यामध्ये १५ महिला स्पर्धकांचाही समावेश आहे.सोमवारपासुन (२३) सलग तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन जेएनपीएचे उपाध्यक्ष रवीश कुमार यांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी जेएनपीए प्रशासनाच्या वरिष्ठ प्रबंधक, सेक्रेटरी तथा जेएनपीए खेल परिषदेच्या अध्यक्षा मनिषा जाधव, कामगार ट्रस्टी रवींद्र पाटील, दिनेश पाटील, जेएनपीएचे विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जेएनपीएत आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय बंदर ४४ व्या कॅरम स्पर्धेत देशभरातील १२ प्रमुख बंदरांपैकी ९ बंदरातील ९ टीम सहभागी झाल्या आहेत. यामध्ये सिंगल, डबल व टीम इव्हेंट अशा विविध प्रतियोगितांमध्ये ही स्पर्धा चालणार आहे. या स्पर्धेसाठी ९५ स्पर्धक सहभागी झाले आहेत. विशेष म्हणजे या वर्षी पहिल्यांदाच महिलांसाठी कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये पाच बंदरातील पाच महिला टीममधील १५ महिला सहभागी झाल्या आहेत. अशी माहिती जेएनपीए खेल परिषदेचे महासचिव कल्पित म्हात्रे यांनी दिली.

---

### खारघर येथे रंगल्या क्रिकेट स्पर्धा

**मुंबई :** लोअर तुडील व ओवळे या गावातील खेळाडुंच्या वतीने खारघर येथे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. ओवेगाव सत्संग मैदानावर सुरू असलेल्या या एकदिवसीय लक्षवेधी स्पर्धेत तालुका महाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे ४८ नोंदणीकृत क्रिकेट संघ या स्पर्धेत खेळले. क्रिकेटप्रेमींमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. एकाच मैदानात दोन गावच्या क्रिकेटच्या स्पर्धा असल्यामुळे खेळाडूंना सोयीस्कर झाले होते.



● मुनवली येथे घाडी बंधू चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेवेळी उपस्थित महाराष्ट्र राज्य विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे स्वागत करताना सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी आदी मान्यवर.

---

## कबड्डीत आता पॉवरप्लेसह टायब्रेकचा प्रयोग

**रेडर किंवा डिफेंडर केल्यास मिळणार दुप्पट गुण**

। मुंबई । प्रतिनिधी ।

आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेतील पॉवरप्ले मधील फटकेबाजीचा आनंद घेण्यास चाहते उत्सुक असतात. मराठमोळ्या कबड्डी स्पर्धेतही हाच पॉवरप्लेचा प्रयोग होणार आहे. मुंबईत येत्या आठवड्यात होणाऱ्या आपली मुंबई कबड्डी स्पर्धेत हा पॉवरप्लेचा आगळा थरार दिसणार आहे.

वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिरात होणाऱ्या या स्पर्धेसाठी मुंबई शहर कबड्डी संघटनेने खेळात काही आगळे नियम आणले आहेत. त्यात पॉवरप्लेचा नियम आणतानाच टायब्रेकरही जास्त आकर्षक करण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, तिसऱ्या चढाईच्या नियम ततही माफक बदल केला आहे. मात्र त्याचा खेळावर परिणाम होऊ शकतो. आत्तापर्यंत कबड्डीच्या दोन अर्धातील चढाया एकत्र मोजल्या जात नाहीत. विश्रांतीनंतर खेळ सुरू होताना पूर्वार्धातील निष्फळ चढाया धरल्या जात नाही.

या स्पर्धेत पूर्वार्धात सलग दोन निष्फळ चढाया असल्यास विश्रांतीनंतरची पहिली चढाई डू और डाय चढाई असेल, हादेखील बदल करण्यात आला आहे. खेळात विविधता आणत पाठीराख्यांची संख्या वाढवण्याचा हा प्रयत्न आहे.

### असा असेल नियम

प्रत्येक संघास एका सामन्यात एक 'पॉवरप्ले' घेण्याची संधी
हा 'पॉवरप्ले' तीस मिनिटांची लढत असल्यास तीन मिनिटांचा
चाळीस मिनिटांचा सामना असल्यास चार मिनिटांचा
चढाई तसेच पकडीच्या प्रत्येक गुणास अतिरिक्त गुण. अर्थात झटापटीत दुप्पट गुण मिळणार
पॉवरप्ले घेत असल्याची माहिती चढाईपूर्वी देणे बंधनकारक
तांत्रिक गुण अथवा निष्फळ चढाईबद्दल कोणतेही पॉवरप्ले गुण नाहीत
पॉवरप्ले सुरू असताना टाइमआऊट घेतल्यास पॉवरप्ले टाइमर ही थांबणार

### टायब्रेकचा नवा प्रयोग असा...

प्रत्येक संघाला तीन चढायांची संधी
प्रत्येक चढाईच्यावेळी नवा आक्रमक
प्रत्येक संघातील चार बचावपटू निश्चित
निवडलेल्या संघातून आक्रमक, बचावपटूंची निवड करण्याची मुभा

---

### चिन्नास्वामी चेंगराचेंगरीतील

## ११ पीडितांना श्रद्धांजली

- **स्टेडियममध्ये ११ जागा नेहमी रिकाम्या राहतील**

। मुंबई । प्रतिनिधी ।

कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशनने एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत जीव गमावलेल्या लोकांना श्रद्धांजली देण्यासाठी एक विशेष उपक्रम हाती घेतला आहे. चेंगराचेंगरीत ११ लोकांचा मृत्यू झाला होता आणि अनेक जण जखमी झाले होते.

आता या घटनेच्या स्मरणार्थ स्टेडियममध्ये एक स्मारक फलक लावण्याचा आणि ११ जागा रिकाम्या ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या जागा त्या ११ लोकांच्या स्मरणार्थ कधीही विकल्या जाणार नाहीत आणि नेहमी रिकाम्या ठेवल्या जातील.

स्मारक स्टेडियमच्या प्रवेशद्वाराजवळ लावले जाईल, जेणेकरून हे ठिकाण नेहमीच श्रद्धांजलीचे प्रतीक राहील. याव्यतिरिक्त, सामन्यापूर्वी पीडितांची नावे प्रदर्शित केली जातील आणि एक मिनिटाचे मौन पाळले जाईल, ज्यात दोन्ही संघ सहभागी होतील.

---

**हरमनप्रीत कर्णधारपदाची धुरा सांभाळणार** | **१७ एप्रिलपासून ५ सामन्यांची मालिका**

# दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारतीय महिला टी-२० संघ जाहीर

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या महिला निवड समितीने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या आगामी टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे.या दौऱ्यासाठी १५ सदस्यीय संघाची कमान अनुभवी अष्टपैलू हरमनप्रीत कौरकडे सोपवण्यात आली आहे, तर स्मृती मंधाना संघाची उपकर्णधार असेल. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांची ही टी-२० मालिका १७ एप्रिलपासून सुरू होणार आहे.



निवडकर्त्यांनी संघात अनुभव आणि युवा उत्साहाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. संघाच्या फलंदाजी क्रमात शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्स आणि ऋचा घोष यांसारख्या स्फोटक फलंदाजांचा समावेश आहे.अष्टपैलू दीप्ती शर्मा देखील संघाचा महत्त्वाचा भाग आहे, जी चेंडू आणि बॅट दोन्हीने सामना फिरवण्याची क्षमता ठेवते. ऋचा घोष आणि उमा छेत्री यांना यष्टिरक्षक म्हणून संघात स्थान मिळाले आहे. जलद गोलंदाजी विभागाची जबाबदारी रेणुका सिंग ठाकूर आणि अरुंधती रेड्डी यांच्यावर असेल. फिरकी गोलंदाजी विभागात श्रेयंका पाटील आणि काश्वी गौतम यांसारख्या उदयोन्मुख चेहऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. संघातील इतर प्रमुख नावांमध्ये क्रांती गौड, श्री चरणी, भारती फुलमाळी आणि अनुष्का शर्मा यांचा समावेश आहे. निवड समितीने या खेळाडूंना घरगुती क्रिकेटमधील आणि मागील दौऱ्यांवरील चांगल्या कामगिरीच्या आधारावर निवडले आहे.भारतीय संघ या दौऱ्यावर एकूण ५ टी-२० सामने खेळेल. या मालिकेची सुरुवात १७ एप्रिल रोजी डर्बनमध्ये होईल.

पहिले दोन सामने याच शहरात खेळले जातील. त्यानंतर तिसरा आणि चौथा टी-२० सामना जोहान्सबर्गच्या मैदानावर होईल. या मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना २७ एप्रिल रोजी बेनोनीमध्ये खेळला जाईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)